गुंतवणूकदारांसाठी सुवर्ण संधी
महावीर पेन्शन ठेव योजना
1 लाख रुपये गुंतवणूक एक वर्षासाठी करा व मिळवा
दरमहा 833/- रुपये व्याज
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900
श्री. संजय काठेड (संस्थापक) Mo. 9372444001

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी.. विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरी बाकाजी देडगांवकर
Since 1935
सराफ अँण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, शनिवार दि. १८.०५.२०२४ | अंक नं. ०६६ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदीवर आकर्षक गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
• फ्रेश स्टॉक • आकर्षक गिफ्ट • भरपूर व्हरायटी • भरपूर डिस्काउंट
सावेडी अ.नगर (0241) 2999299
संगमनेर (02425) 222226
नारायणगाव (02132) 242132

## शेअर बाजारात शनिवारीही ट्रेंडींग; सेन्सेक्स व निफ्टीत तेजी

मुंबई – डिझास्टर रिकव्हरी साइटच्या चाचणीसाठी शनिवारी (दि.१८) बाजार सुरु होता. सलग तिसऱ्या सत्रात बाजार तेजीसह बंद झाला. सेन्सेक्स ८९ अंकांनी वाढून ७४,००५ वर बंद झाला आणि निफ्टी ३६ अंकांनी वाढून २२५०२ वर बंद झाला. नेस्ले इंडिया, पॉवरग्रिड आणि टाटा मोटर्स निफ्टीमध्ये सर्वाधिक वाढले.

जेएसडब्ल्यू स्टील, महिंद्रा अँण्ड महिंद्रा आणि अल्ट्राटेक सिमेंटला सर्वाधिक नुकसान झाले. महाराष्ट्रात सोमवारी (दि.२०) लोकसभा निवडणुकीसाठी मतदान होत आहे, त्यामुळे बाजारपेठ बंद राहणार आहे. आता मंगळवारी बाजार सुरू होणार आहे. विशेष व्यवहारादरम्यान निफ्टी ५० निर्देशांक २२,३४५.६५ अंकांच्या नीचांकी पातळीवर पोहोचल्यानंतर अखेर ९८.१५ अंकांच्या किंवा ०.४४ टक्क्यांच्या वाढीसह २२,५०२ अंकांवर बंद झाला. व्यवहारादरम्यान तो २२,५०६ अंकांच्या उच्चांकावर पोहोचला.

देशांतर्गत शेअर बाजार सामान्यतः शनिवार आणि रविवारी बंद असतात, परंतु यावेळी व्यवहार शनिवारीही झाला. शनिवारीही शेअर बाजार उघडण्याची या वर्षातील ही तिसरी वेळ आहे. आजचा व्यवसाय डिझास्टर रिकव्हरी साइटच्या माध्यमातून करण्यात आला. डिझास्टर रिकव्हरी साइटची चाचणी दोन विशेष सत्रांमध्ये झाली. पहिले सत्र ९.१५ ते १०.०० पर्यंत चालले. त्यानंतर दुसऱ्या सत्रासाठी सकाळी ११.३० वाजता बाजार पुन्हा उघडला आणि दुपारी १२.३० वाजता बंद झाला.

आजच्या व्यवहारात संरक्षण क्षेत्रातील अनेक शेअर्स ५-५ टक्क्यांनी वधारले. आजच्या विशेष सत्रात व्यापारासाठी सर्व शेअर्सवर ५ टक्के मर्यादा घालण्यात आली. म्हणजे आजच्या व्यवसायात कोणताही शेअर ५ टक्क्यांपेक्षा जास्त वाढू किंवा घसरू शकत नाही.

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी 2 BHK चे २ फ्लॅट भाड्याने देणे
तेलीखुंट, पॉवर हाउस
8623963979

ही जाहिरात दाखवा आणि मिळवा स्मॉल मॉकटेल फ्री..फ्री
UFO Fries & Corn
प्रोफेसर चौक, सावेडी, अ.नगर
टिप : २००/- रु. किंवा अधिकच्या खरेदीवर ही ऑफर लागू



लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर झोपलेले मोकाट कुत्रे. (छाया – महावीर पोखरणा)

## लाचलुचपत कार्यालयाच्या आवारातच कुत्र्यांचा वावर

### कर्मचाऱ्यांसह कार्यालयात येणाऱ्या नागरिकांमध्ये भितीचे वातावरण

नगर – भटकी (मोकाट) कुत्री पकडण्यासाठी मनपाची अपुरी यंत्रणा असल्यामुळे या कुत्र्यांचा त्रास शहरासह उपनगरातील नागरिकासह आता सरकारी कार्यालयामध्येही होत आहे. जिल्हा रुग्णालयात मागील सहा महिन्यांत दिलेल्या रेबीज प्रतिबंधक इंजेक्शनची संख्या पाहता, या काळात दीड हजारांपेक्षा जास्त नागरिकांना कुत्रा चावल्याचे स्पष्ट झाले आहे.

शहरातील भटक्या कुत्र्यांचा प्रश्न एकीकडे गंभीर होत असताना, हा प्रश्न सोडवण्यासाठी शहरात मनपाकडून ठोस उपाययोजना राबवल्या जात नसल्याचे चित्र आहे तर दुसरीकडे शहराच्या सावेडी उपनगराच्या टिव्ही सेंटर भागातील प्रशासकीय भवनमध्ये नगरचे तहसील कार्यालय, सीआयडी, लाचलुचपत, धर्मादाय, ग्राहक मंच सह १५-२० विभागाचे सरकारी कार्यालये आहेत. या प्रशासकीय कार्यालयाच्या आवारातील लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयाच्या प्रवेशद्वाराच्या बाहेरच मोकाट कुत्रे ठाण मांडत असून येथे येणाऱ्या नागरिकांना तसेच येथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जीव मुठीत धरून काम करावे लागते.

सारडा इंटेरिअर
9823033039, 9834370919
पहिला मजला दुसरा मजला, सारडा लेन, अहमदनगर.
नवीन प्रकारची रेक्झिनची चटई, टेबल कवर, किचन अॅप्रीन, फ्रीजटॉप व वॉशिंग मशीन कवर ईत्यादी.
मतदान करा सर्व मालावर १५% सूट मिळवा
मतदान केल्याचा पुरावा म्हणून बोटावर लावलेली शाई दाखविणे
आपल्या सुंदर घरासाठी व ऑफिससाठी होम डेकोरचे नाविन्यपूर्ण स्टॉक उपलब्ध..
बेडशीट, कर्टन, ब्लँकेट, गालीचा, सोलापुरी चादर, गादीपाठ, सतरंजी, मच्छरदाणी, सोफा कव्हर, दिवाण सेट, दोहड, पिलोज आणि टॉवेल, डोअर मॅट, इतर अॅक्सेसरीजची भरपूर नवीन डिझाईन व व्हेरायटी, भरपूर रेंज ...
ऑफर दि.१३ मे २०२४ ते २० मे २०२४ पर्यंत

शनिवार, रविवार दि.१८, १९ मे २०२४ सकाळी ९ ते रात्री १० वा.
BOND संघटन नगर आयोजित
झेप 2024
भव्य प्रदर्शन खरेदी व विक्री
खिशाला परवडणारी खरेदी.. फक्त झेप!
- : स्थळ : - मौर्या मंगल कार्यालय पाईपलाईन रोड, अहिल्यानगर
अवश्य भेट द्या
आपल्यासाठी गृहोपयोगी वस्तुंचे स्टॉल एकाच ठिकाणी
-: Sponsered by :- Chaturang, स्वामीसुगंध One Stop Pooja Shop, अर्चना'ज फुड, Archana's Herbal

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Floor Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

EARTH's Green Library
Greenery for Every Space
Indoor Plants for your Home!
Get a Plant Today!
Indoor Plants | Garden Accessories
Potted Planters | Garden Furniture
Premium Planters | Garden Lightings
Amit Sanklecha 99231 43334 Website : greenlibrary.in
Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003

गरजा अनेक सोल्युशन फक्त एकच
Finolex Pipes & Fitings
Long Lasting Pipes
पिढीया बदलेंगी पाईप नही...
अधिकृत विक्रेते!
मे. अभय सेल्स कॉर्पोरेशन हार्डवेअर
सर्वोदय कॉलनी समोर, गजानन हॉस्पीटल शेजारी, सातभाई मळा, दिल्ली गेट, अहमदनगर
9145008009 / 9822542011

हॉटेल निसर्गाची चव अशी की.. विसरावी कशी..?
हॉटेल #निसर्ग
Pure 100%
फॅमिलीसाठी स्वतंत्र व्यवस्था उपलब्ध
– शुध्द शाकाहारी खवय्यांसाठी –
– मांसाहारी खवय्यांसाठी –
खास मेजवानी म्हणजेच हॉटेल निसर्ग
स्पेशल व्हेज दम बिर्याणी
स्पेशल मटण-चिकन दम बिर्याणी
शेतावरचे मटण-चिकन | चपाती बाजरी-ज्वारी भाकरी
पिठलं-ठेचा | काळा मसाल्यातल्या शेवगा
पत्ता : कांबळे मळा, नगर-पुणे रोड, केडगांव, अ.नगर
योगेश रघुनाथ साठे : मो. 7774970987

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, मौजे बोल्हेगाव ता. नगर येथील महानगरपालिका हद्दीतील जमीन **सर्व्हे नं. ३४/३ याचे क्षेत्र १ हेक्टर** ९७ आर ही मिळकत

**१. श्री. विजय विष्णुप्रसाद मर्दा**
**२. श्री. मयुर वसंतलाल शेटीया**
**३. श्री. हर्षल संतोष भंडारी**

यांची मालकी वहिवाटीची होती. त्यांनी सदर मिळकती लगतचे **सर्व्हे नं. १९/७, २४/२, ३०/१, ३१/१, ३१/२, ३२,३३ व ३४/४** चे जमिन मालकांबरोबर हातमिळवणी करून सर्व जमिनीचा मिळून एकत्र लेआऊट केला. त्यास महानगरपालिकेने ता. २/५/२०२२ रोजी तात्पुरती मंजुरी दिली सदर मिळकत मा. तहसिलदार यांच्या ता. ७/६/२०२२ च्या आदेशाने बिगरशेती मंजुरी देण्यात आली होती. सर्व जमिन मालकांची आपसातील समजुतीनुसार सदर ले आऊट पैकी प्लॉट नं. **३६६ ते ४३३ याचे क्षेत्र** ७१८६.४९ चौ. मि. ही मिळकत श्री. विजय विष्णुप्रसाद मर्दा व मयुर वसंतलाल शेटीया यांच्या हिश्याचे असल्याचे आमचे अशील **श्री. यशवंत सोन्याबापू धामणे** यांना सांगण्यात आले होते. श्री. विजय मर्दा व मयुर शेटीया यांनी आमच्या अशिलास सदर प्लॉट मिळकती खरेदी देण्याचे ठरवून आमचे अशिलाकडून मोबदल्याची रक्कम स्वीकारून आमच्या अशिलाच्या लाभात साठेखताचा दस्त लिहून दिला. सदर दस्तावर श्री. हर्षल संतोष भंडारी यांनी मान्यतादर्शक सही देखील केलेली आहे. साठेखताच्या अटीव शर्तीनुसार सदर लेआऊटला अंतिम मंजूरी मिळाल्यानंतर आमच्या अशिलाच्या लाभात खरेदीखत करून द्यायचे ठरले होते.

परंतु बराच काळ जावून देखील ले आऊट ला अंतिम मंजुरी मिळाली किंवा नाही. याबाबत समाधानकारक माहिती मिळत नसल्यामुळे मा. न्यायालयात दावा करण्यासाठी आमच्या अशिलाने मिळकतीचा ७/१२ उतारा काढला असता श्री. विजय मर्दा व श्री. मयुर शेटीया यांनी गैरहेतुने सदर मिळकती मधील त्यांच्या हिश्याची जागा बेकायदेशीररित्या **श्री. संदिप बालचंद सुराणा** यांना खरेदी दिल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे आमच्या अशिलाने मा. न्यायालयात सदर प्लॉट मिळकतीचे खरेदी खत करून मिळण्याकरिता व इतर दादी मिळण्याकरिता दावा केला आहे. सदर संदिप सुराणा व इतरांनी आपसात बेकायदेशीर रित्या संगनमत करून आमच्या अशिलाचे कायदेशीर हक्क डावलण्याच्या गैरहेतुने ता. ०२/०४/२०२४ चा तथाकथीत वाटणीपत्राचा दस्त करताना जाणून बुजून सदर ले आऊट मध्ये **प्लॉट नं. ३६६ ते ४३३** ऐवजी **प्लॉट नं. ३६६ ते ३८७ व ७८४ ते ८३९** त्यांच्या हिश्यात दिल्याचे दाखविले आहे. आमच्या अशिलाचे अर्जावरून मा.न्यायालयात सुनावणी होवून मे. कोर्टाने श्री. संदिप बालचंद सुराणा यांनी प्लॉट नं. ३६६ ते ३८७ बाबत दाव्याचा अंतिम निकाल होई पावेतो कोणताही हस्तांतरणांचा व्यवहार करू नये. मिळकतीवर बोजा निर्माण करू नये. असा मनाई हुकूम दिला आहे. प्लॉट नं. ३६६ ते ४३३ ही मिळकत दाव्याचा विषय झालेली आहे. प्लॉट नं. ७८४ ते ८३९ बाबत देखील आमचे अशिल मा. न्यायालयात योग्य ती कायदेशीर कारवाई करणार आहेत.

तरी सदर लेआऊट पैकी प्लॉट नं. ३६६ ते ४३३ व प्लॉट नं. ७८४ ते ८३९ या मिळकतीबाबत श्री. संदिप बालचंद सुराणा यांच्या बरोबर कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. कळावे

दि. १८ मे २०२४
अहमदनगर

**श्री. प्रमोद कां. मेहेर,**
४, गोवर्धन अपार्टमेंट, अहमदनगर
**(श्री. यशवंत सोन्याबापू धामणे यांचेकरिता)**

तृतीय पुण्यस्मरण
तुमचे शब्द आम्हा गीतापुराणासमान,
तुमची आज्ञा आम्हासाठी ब्रम्हलिखीत प्रमाण..
तुमच्या ऋणाचे न फेडता येई पांग,
तुमचा हात सदैव आशिर्वादासाठी असो..
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!
स्व. विनायक रंगनाथ मंचरकर
स्व. दि. २३/०५/२०२१
तिथि प्रमाणे १९/०५/२०२३
– दुःखांकित –
श्रीमती वंदना विनायक मंचरकर (पत्नी)
श्री. सुनिल(बंडू) रंगनाथ मंचरकर (भाऊ) | श्री. विशाल विनायक मंचरकर (मुलगा)
श्री. स्वप्निल सुनिल मंचरकर (पुतणे) | कु. सलोनी सुनिल मंचरकर (पुतणी)
समस्त मंचरकर परिवार

|| कुलस्वामिनी प्रसन्न ||
शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस
नगर-पुणे-नगर
आता आपल्या शहरातून
दररोज
नगर येथून स. ७,८,९ व दुपारी २.००
पुणे येथून स.११,१२,२ व सायं.५ वा
Ac Xccent / WegonR / Dzire
प्रत्येक वेळेस निरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
पिकअप पॉईंट - चितळेरोड, मार्केटयार्ड, सक्कर चौक...
अमर-प्रेम हॉलिडेज
ऑफिस - चितळेरोड, अ.नगर
9657746555/ 9226399555

# उन्हाळ्याच्या सुट्टीत सुरु आहे मिशन ऑलंपिकची तयारी

## गावातील मुले गिरवताहेत शास्त्रशुद्ध पद्धतीने कुस्ती मल्ल विद्येचे धडे


सारोळा कासार (ता.नगर) येथे युवा महाराष्ट्र केसरी विष्णू खोसे याच्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेल्या उन्हाळी कुस्ती प्रशिक्षण शिबिरात सहभागी झालेले कुस्ती पटू.

नगर – उन्हाळ्याच्या सुट्टीत सर्वत्र विविध प्रकारच्या शिबिरांचे आयोजन करण्यात येते. मात्र नगर तालुक्यातील सारोळा कासार या गावात यावर्षीच्या सुट्टीत एक आगळे वेगळे शिबीर सुरु आहे. ते म्हणजे मिशन ऑलंपिकचे ध्येय समोर ठेवून शास्त्रशुद्ध पद्धतीने कुस्ती मल्ल विद्येचे धडे गिरवण्याचे. त्याच बरोबर अव्वल कुस्ती पटू होण्यासाठी लागणारा संतुलित आहार घेण्याचे. गावचा सुपुत्र आणि युवा महाराष्ट्र केसरी विष्णू खोसे याच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली हे शिबीर सध्या सुरु आहे.

विष्णू खोसे याने कुस्ती क्षेत्रात महाराष्ट्रात मोठे नाव कमावलेले आहे. कोल्हापूर, पुणे सारख्या विविध नामांकित कुस्ती संकुलांमध्ये सरावही केलेला आहे. विविध कुस्ती मैदाने आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभाग घेत त्याने अनेक पारितोषिके मिळविलेली आहेत. गेल्या २ वर्षांपासून गावातील जय बजरंग तालमीत तो गावातील मुलांना कुस्तीचे धडे देत आहे. आपल्या गावातील व परिसरातील खेळाडू जिल्हा, राज्य, राष्ट्रीय स्तरावर खेळले पाहिजेत, थेट ऑलंपिक स्पर्धेपर्यंत त्यांनी मजल मारली पाहिजे हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून या मुलांसाठी १ महिन्याचे हे शिबीर आयोजित करण्याची संकल्पना त्याला सुचली आणि त्याने ती अंमलातही आणली आहे.

या शिबिराचे नुकतेच शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. यावेळी पै. राजाराम धामणे, खरेदी विक्री संघाचे संचालक संजय धामणे, बाजार समितीचे सहसचिव संजय काळे, शिवाजी कडूस, गोरख काळे, नाना पारधे, गजानन पुंड, शहाजान तांबोळी, सुभेदार शंकर खोसे, प्राचार्य संपतराव काळे, मोहन काळे, नामदेव धामणे, वैजनाथ धामणे यांच्या सह शिबिरार्थी, त्यांचे पालक व गावातील ग्रामस्थ उपस्थित होते. सूत्रसंचालन दत्ता जाधव यांनी केले.

या शिबिरात सहभागी मुलांना १ महिनाभर मोबाईल वापरास बंदी घालण्यात आलेली आहे. त्यांना दररोज नित्यनियमाने पौष्टिक तसेच संतुलित आहार दिला जात आहे. या शिवाय माती आणि गादी या दोन्ही विभागात त्यांचा कुस्तीचा सराव घेतला जात असून विविध डावपेच शिकवले जात आहेत. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये असलेल्या नियमांची माहिती सांगितली जात आहे. या शिवाय चपळता येण्यासाठी विविध मैदानी खेळांचाही सराव करून घेतला जात आहे. शिबिराच्या यशस्वीतेसाठी विष्णू खोसे, शंकर खोसे यांच्यासह पै. विजय साळवे, पै. बुद्धभूषण साळवे व त्यांचे सहकारी परिश्रम घेत आहेत.

# अय्यप्पा मंदिराचा २२ ते २४ मे दरम्यान प्रतीस्थापना महोत्सव



नगर – मधील सावेडीतील श्री आयप्पा मंदिराचा ३० वा प्रतीस्थापना महोत्सव (वर्धापनदिन) २२ ते २४ मे पर्यंत तीन दिवस साजरा होत असून त्यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन गुरुवार्याच्या उपस्थिती करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष के. के. शेट्टी यांनी दिली

सावेडीतील श्री अय्यप्पा मंदिर हे अत्यंत आकर्षक असून यामध्ये अय्यप्पा स्वामी, गणपती व सरस्वतीची स्वतंत्र मंदिरे आहे, यास २९ वर्षे पूर्ण झाली असून वार्षिक वर्धापन दिनानिमीत पहाटेपासूनच विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहे यामध्ये महागणपतीहोम, अभिषेक, प्रसन्ना पूजा व लक्षार्चन होणार आहे तर कलशपूजा अय्यप्पा स्वामी, गणपती व सरस्वती देवीची होणार आहे

२२ मे रोजी संध्याकाळी गणपती पूजा, आचार्य वरणम्, प्रसाद शुद्धी क्रिया, अस्त्र कलश पूजा, रक्षोघ्न होमम, वास्तु होमम, कलशम, वास्तुबाली, अथजा पूजा विधी होणार आहे.

२३ मे रोजी सकाळी महागणपती होमम्, महा मृतुंजय होमम्, चथु शुधी, धारा, पंचकम, अनुज्य कलशम्, उंच पूजा विधी तर संध्याकाळी द्रव्य कलश पूजा, आदिवासी होमम् अथजा पूजा विधी होणार आहे.

२४ मे रोजी सकाळचे विधी गणपती होमम, उषापूजा, अष्टबंधम चारथाळ, कलशाभिषेकम्, वाहन प्रतिष्ठा आणि नमस्कार मंडप समर्पण, कुंभ भिषेक, उंच पूजा तर संध्याकाळी, भगवती सेवा, पुष्पाभिषेकम्, अथझा पूजा होणार आहे. संध्या ५ वा सावेडीतून शोभायात्रा (तालापोळ्ळी) काढण्यात येणार आहे. महिला मोती कलरच्या साड्या परिधान करून हातात फुलांनी सजवलेली ताट व त्यामध्ये अर्धा नारळ दिवा प्रज्वलित करतात ही तालापोळ्ळी पाहण्यासाठी नागरिक गर्दी करतात तर मंदीर परिसर फुलांनी व दिव्यांनी सजविण्यात येते. यामध्ये वाद्यसंघम सादर करणार आहे

संध्या ७ वा दीपआराधना, भगवती सेवा, पुष्पभिषेक, आथंजा पूजा करण्यात येणार असून. नंतर भाविकांना महाप्रसाद होणार आहे. तरी सर्व कार्यक्रमांना भाविकांनी उपस्थित राहावे तसेच. श्री आयप्पा सेवा समितीच्या कलश पुजेस ज्यांना सहभागी व्हायचे असेल त्यांनी व अन्नदानासाठी मंदिरात किवा ९८६०४१७६५३ किंवा ९८६०५४२०६८ या मोबाईल वर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे

# नगर शहरात ३० मे रोजी जिल्हास्तरीय धम्म परिषद

## सोमवारपासून दहा दिवसीय श्रामणेर विधीकर्ता शिबिराला होणार प्रारंभ



नगर – अहमदनगर जिल्हा भिक्खू संघ, तथागत बुद्धिस्ट सोसायटी (इंडिया) व बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात दहा दिवसीय निशुल्क श्रामणेर विधीकर्ता शिबिर व जिल्हास्तरीय पहिली भूमिपुत्र धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी (दि.२० मे) नवीन टिळक रोड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे श्रामणेर विधीकर्ता शिबिराला प्रारंभ होणार आहे. तर ३० मे रोजी नंदवन लॉन्स येथे धम्म परिषद होणार असल्याची माहिती संजय कांबळे, रमेश पगारे व शिवाजी भोसले यांनी दिली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या सम्यक सामाजिक आणि धार्मिक क्रांती अभियानाला गती देण्यासाठी व तथागत सम्यक संबुध्द यांनी उपदेशित केलेल्या धम्माला जाणण्यासाठी दहा दिवसीय श्रामनेर धम्म प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले. २० ते ३० मे दरम्यान होणाऱ्या दहा दिवसीय श्रामणेर विधीकर्ता शिबिरात बौध्द भिक्खू मार्गदर्शन करणार आहेत. महिला उपासिकांसाठी दुपारी २ ते ४ ही स्वतंत्र वेळ ठेवण्यात आली आहे.

३० मे रोजी श्रामणेर विधीकर्ता शिबिराचा समारोप होऊन जिल्हास्तरीय धम्मपरिषद पार पडणार आहे. सकाळी ध्वजारोहण व परिसरातून धम्म रॅलीचे नियोजन करण्यात आले आहे. या धम्म परिषदेच्या उद्‌घाटन सत्रात सत्येंद्र तेलतुंबडे, दुसऱ्या सत्रात प्रा. डॉ. विलास खरात व तिसऱ्या समारोपीय सत्रात भिक्खू शाक्यपुत्र राहुल पैठण मार्गदर्शन करणार आहेत.

या कार्यक्रमातून अखिल मानव जातीचे दुःख मुक्त करणारे तथागत सम्यक संबुद्ध यांचा सद धम्म जाणून घेण्याची संधी उपलब्ध होणार असून याचा लाभ घेण्याचे व धम्म परिषदेला उपस्थित राहण्याचे आवाहन समाजबांधवांना करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संजय कांबळे ९९७०७७५५२२, रमेश पगारे ९४२२७९७७५५ व शिवाजी भोसले ९३७२४४३७०५.

# मेहेतर वाल्मिकी ब्रिगेडची सभा उत्साहात

## संघटन मजबूत राहिल्यास प्रत्येक घटकाची उन्नत्ती होईल : सदस्य पुरणदास उदासी यांचे प्रतिपादन


भिंगार येथे सकल मेहेतर वाल्मिकी ब्रिगेड सकल सेवाभावी संस्थेची सभा उत्साहात झाली. याप्रसंगी संतोष नवसुपे, पुरणदास उदासी, राधेलाल छन्नू नकवाल, कुणाल बैद, राकेश सारवान, राजेश बैद, आकाश चंदेले, सौरभ चौटिले, नितेश चव्हाण, साहील बैद, निलेश चौटिले, करण नकवाल, दिपक नकवाल, किशोर भगवणे आदि.

नगर – भिंगार येथे सकल मेहेतर वाल्मिकी ब्रिगेड सकल सेवाभावी संस्थेची सभा उत्साहात झाली. याप्रसंगी नूतन कार्यकारणीची निवड करण्यात आली. यावेळी शिव राष्ट्र सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संतोष नवसुपे, ज्येष्ठ सदस्य पुरणदास उदासी, राधेलाल छन्नू नकवाल, कुणाल बैद, समाजाचे नूतन अध्यक्ष राकेश सारवान, राजेश बैद, सचिव आकाश चंदेले, सौरभ चौटिले, खजिनदार नितेश चव्हाण, सहखजिनदार साहील बैद, उपाध्यक्ष निलेश चौटिले, करण नकवाल, छडी जमदार (कोतवाल) दिपक नकवाल, अ.भा.सफाई मजदूर कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष किशोर भगवणे उपस्थित होते.

यावेळी संस्थेत नवीन सभासद दाखल झाले त्यांचाही यावेळी ब्रिगेट सकल सेवाभावी संस्थेचे ब्रिगेटी जमदार राजेंद्र विष्णुराज नाकवाल यांच्या हस्ते पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच कल्याण निधी सदस्यांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी पुरणदास उदासी म्हणाले, समाजाच्या उन्नत्तीसाठी मेहेतर वाल्मिकमी ब्रिगेडचे काम चांगल्या पद्धतीने सुरु आहे. समाजातील सर्वांनी ब्रिगेडच्या पाठीशी राहिल्यास त्यांना मोठे बळ मिळेल आणि त्यातून समाजातील प्रत्येक घटकाची उन्नत्ती होईल, असे सांगून नूतन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी संतोष नवसुपे म्हणाले, आज प्रत्येक हिंदू समाजाने एकत्र येणे गरजेचे आहे. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, अण्णाभाऊ साठे यांनी अन्यायाविरुद्ध लढा दिला म्हणून आपण आज चांगले दिवस पाहत आहोत. आपल्या हक्कासाठी शिवराष्ट्र सेना आपल्या पाठीशी उभा राहील, असे आश्वस्त केले.

यावेळी संतोष सारसर, राजू नकवाल यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजू चौटिले, मोहन चव्हाण, अनिल चौटिले, जयप्रकाश सारसर, रंजित बैद, अमित बैद, आदेश नकवाल, हरिदास चावरे, पवन सेवक, दिनेश मेहेरोलिया, सुमित नकवाल, प्रेमप्रकाश चंदेले, सूरज नकवाल, संतोष सारसार, प्रवीण नकवाल, जय चोटीले, प्रेमप्रभु गोहेर आदींनी परिश्रम घेतले.

# सदगुरू शंकर महाराज हे दत्तप्रभूंचे ७ वे अवतार

**स्वामी विश्वेश्वर महाराज यांचे प्रतिपादन**


एम.आय.डी.सी.तील मंगल दत्त क्षेत्रात सद्‌गुरू श्री शंकर महाराज समाधी सोहळ्याप्रसंगी प्रवचनात बोलताना स्वामी विश्वेश्वर महाराज. उपस्थित भाविक वर्ग दिसत आहेत.

नगर – दत्तप्रभूंचे सप्तरूपी स्वरूप आहे यामध्ये प्रथम दत्तप्रभू, दुसरे बालस्वरूप, तिसरे नुरसिंह, चवथे गजानन महाराज, पाचवे स्वामी समर्थ, सहावे साईबाबा व सातवे शंकर महाराज आहेत यातील ४ स्वरूप हे अवलिया आहेत असे प्रतिपादन स्वामी विश्वेश्वर महाराज यांनी केले.

एमआयडीसीच्या मंगल दत्त क्षेत्रात सद्गुरू श्री शंकर महाराज समाधी सोहळा मोठ्या उत्साहात झाला. त्यावेळी ते प्रवचनात बोलत होते. ते पुढे म्हणाले शंकर महाराज म्हणत कि रिद्धी सिद्धीच्या मागे धावू नका कर्म कांड करू नका, कर्म योग्य प्रकारे करा, वाणीचा योग्य वापर करा, आपण कोणत्या भावनेने कर्म करतो हे महत्वाचे आहे कोणत्या दिशेने विचार करतो, काय खातो, काय पितो यातील भाव महत्वाचा आहे या भावावर भूतकाळाचा प्रत्येक काळाचा पाया हा वर्तमान काळातील अवस्था दाखवितो

या दत्तक्षेत्रांत दर गुरुवारी भाविकांची दर्शनासाठी गर्दी असते, मानवाला मनशांती मंदिरात गेल्यावर मिळते म्हणून मानव मंदिरात येतो सगळं काही योग्य पद्धतीने मिळवून देण्याचं सामर्थ्य दत्तप्रभूंच्या दरबार मध्ये आहे आपल्या येथे कुठलीही दोरी बांधलेली नाही, कुठलेही काही नियम नाहीत म्हणून दर्शन घ्यायला आडकाठी नाही, आपले हे स्थान ४० वर्षपूर्वीचे आहे तेव्हापासून भाविक येथे दर्शनाला भाविक येत आहेत असेही ते म्हणाले. यावेळी भाविक उपस्थित होते.

# अशोक आयडियल स्कूलचा १० वीचा १०० टक्के निकाल

## श्रेया कसार प्रथम, निशांत रोहकले तर दिशा आरोटे यांनी अनुक्रमे पटकावला दुसरा व तिसरा क्रमांक





नगर – अशोक कारखाना संचलित व माजी आ.भानुदास मुरकुटे यांचे मार्गदर्शनाखालील अशोक आयडियल स्कूलचा दहावी बोर्डाच्या शंभर टक्के निकाल लागला. श्रेया कसार (८७%) हिने प्रथम, निशांत रोहकले (८३.६%) तर दिशा आरोटे (८२.६%) यांनी अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक मिळविला.

अशोक आयडियल स्कूलने शंभर टक्के निकालाची परंपरा यावेळीही कायम राखल्याचे स्कूलच्या संचालिका तथा अशोक कारखान्याच्या संचालिका सौ.मंजुश्रीताई मुरकुटे यांनी सांगीतले. या विद्यार्थ्यांना प्राचार्य रईस शेख, सुनिल बागुल, प्रियंका आहेर, वनमाला गरुड, सायना शेख, वृषाली बकरे, रुपाली देशमुख व सय्यद यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी आ.भानुदास मुरकुटे, व्हा.चेअरमन पुंजाहरी शिंदे, अग्रो इंडस्ट्रीज अँड एज्युकेशन फौंडेशनचे अध्यक्ष सोपानराव राऊत, उपाध्यक्ष बाबासाहेब आदिक, सचिव विरेश गलांडे, सहसचिव भास्कर खंडागळे तसेच कारखान्याच्या संचालक मंडळाने अभिनंदन केले आहे.



## मंगल दत्त क्षेत्रात मंगल भक्त सेवा मंडळाच्या वतीने पालखी सोहळा

एमआयडीसीतील मंगल दत्त क्षेत्रात मंगल भक्त सेवा मंडळाच्या वतीने आयोजलेल्या श्री शंकर महाराज समाधी सोहळा मध्ये पालखी सोहळा झाला. यामध्ये भाविक सहभागी झाले होते.

# बलात्कार व विनयभंगच्या आरोपातून निर्दोष मुक्तता

नगर – अमोल पांडुरंग शिंदे (वय २४, रा.वनकुटे, ता.पारनेर) या आरोपीची बलात्कार, विनयभंग तसेच बालकाचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायद्यातून विशेष जिल्हा न्यायाधिश श्रीमती माधुरी एच. मोरे यांनी निर्दोष मुक्तता केली.

या खटल्यात सरकार पक्षातर्फे ६ साक्षीदार तपासण्यात आले. आरोपीतर्फे ॲड. अजित रोकडे यांनी कामकाज पाहिले. त्यांना ॲड. श्रीकांत गवळी, ॲड. संदीप दिवऐ, ॲड. प्रतापराव शिंदे यांचे सहकार्य लाभले. तसेच ॲड. आशिष पोटे, ॲड. आकाश अकोलकर, ॲड. अक्षय कुलट यांचे सहाय्य लाभले.

# विद्यार्थ्यांनी संशोधनाच्या विषयाच्या तळाशी जात सखोल ज्ञान घ्यावे

**ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत भोंजाळ**


पेमराज सारडा महाविद्यालयामध्ये पीएचडी विद्यार्थ्यांसाठी विद्यावाचस्पती कार्याभ्यास कोर्सचे उद्‌घाटन करताना ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत भोंजाळ.

## पेमराज सारडा महाविद्यालयात विद्यावाचस्पती कार्याभ्यास कोर्सचे उद्‌घाटन

नगर – संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या संशोधनाचा फायदा येणाऱ्या पिढीला होईल या भावनेने करावे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अधिक प्रोत्साहन देवून संशोधनाच्या प्रवाहात आणणे आवश्यक आहे. संशोधनासाठी फार किचकट विषय न घेता साध्या व सोप्या विषयांची निवड करावी. त्या विषयाचे सखोल ज्ञान घेत तळाशी जाऊन विद्यार्थ्यांनी संशोधन करावे. यासाठी तासंतास त्या विषयाचे वाचन करावे. संशोधन व अनुवादन सकारात्मक विचाराने केले तर ते नक्की यशस्वी होते. विद्यावाचस्पती कार्याभ्यास कोर्सचे आयोजन करून सारडा महाविद्यलयाने विद्यार्थ्यांना उचित प्रोत्साहन व मार्गदर्शन केले आहे, असे प्रतिपादन साहित्यिक व अनुवादक चंद्रकांत भोंजाळ यांनी केले.

पेमराज सारडा महाविद्यालयाच्या मराठी संशोधन केंद्राच्या वतीने महाविद्यालयात पीएचडीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित विद्यावाचस्पती कार्याभ्यास कोर्सचे उद्‌घाटन चंद्रकांत भोंजाळ यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष ॲड.अनंत फडणीस होते. यावेळी महाविद्यालयाचे चेअरमन सुमतिलाल कोठारी, प्राचार्य डॉ.महेश्वरी गावित, प्रबंधक अशोक असेरी, प्रा. प्रकाश जाधव, प्रा.दया देठे, ज्येष्ठ कवी व संशोधन केंद्राचे विद्यार्थी चंदकांत पालवे आदींसह प्राध्यापक व कार्याभ्यासमध्ये सहभागी झालेले विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी मराठी संशोधन केंद्रातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सुमारे महिनाभर चालणाऱ्या या कोर्समध्ये राज्यात नावाजलेले तज्ञ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

ॲड.अनंत फडणीस म्हणाले, विद्यार्थी हित लक्षत घेवून सारडा महाविद्यालयाने करोना कळतही विद्यावाचस्पती कार्याभ्यास कोर्सचे आयोजन केले होते. डॉ.माहेश्वरी गावित या महाविद्यालयाच्या प्राचार्य झाल्यापासून महाविद्यालयातील उपक्रमांमध्ये वाढ झाली आहे. विद्यावाचस्पती कार्याभ्यास कोर्सचा लाभ घेत विद्यार्थ्यांनी उच्च स्थान प्राप्त करावे.

सुमतिलाल कोठारी म्हणाले, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देवून मार्गदर्शन करण्यासाठी सारडा महाविद्यालयात कायमच विविध शैक्षणीक उपक्रमांना प्राधान्य दिले जात आहे. मराठी संशोधन केंद्राच्या विद्यावाचस्पती कार्याभ्यास कोर्सचा फायदा घेवून आर्व विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर पिएचडीची पदवी प्राप्त करावी.

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित म्हणाल्या, इतर महाविद्यालयांमध्ये विद्यावाचस्पती कार्याभ्यास कोर्सचे आयोजन आभासी पद्धतीने होत आहे. पण सारडा महाविद्यालयाने करोना काळातही ऑफ लाईन हा कोर्स घेत आता दुसऱ्यांदा कोर्सचे आयोजन केले आहे. या कोर्समध्ये विद्यार्थ्यांना पुढील एक महिना विविध तज्ञांचे मार्गदर्शन मिळणर असल्याने याचा मोठा फायदा विद्यार्थ्यांना होणार आहे. सूत्रसंचालन संगीता फासाटे यांनी केले. ऋता ठाकूर यांनी आभार मानले.



# सीबीएसई दहावी परीक्षेत मृण्मयी गिरमे हिचे यश



नगर - नुकत्याच सीबीएसई बोर्ड दिल्लीतर्फे मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी बोर्डाच्या परीक्षेत नगर येथील जामखेड रोडवरील तकक्षीला शाळेची विद्यार्थिनी कु. मृण्मयी दत्तात्रय गिरमे हिने ९५.२०% गुण मिळवून तकक्षीला शाळेत पहिल्या पाच विद्यार्थ्यांत स्थान मिळवले.

मृण्मयी ही लहानपणापासून शिक्षणात खूप हुशार आहे व कलेतही निपुण आहे, ती उत्कृष्ट गिटार वादक आहे व जलतरणमध्ये तिला विशेष रुची आहे. तिचे वडील स्व. डॉ. दत्तात्रय गिरमे यांचे दोन वर्षांपूर्वी अकस्मित निधन झाल्यानंतर या दुःखातून सावरून सर्व संकटांवर मात करत तिने सीबीएसई दहावी बोर्डाची परीक्षा विशेष श्रेणीत पास होऊन तीने शाळेत पहिल्या पाच विद्यार्थ्यांमध्ये स्थान पटकावले. तिने समाजशास्त्र व हिंदी विषयात शाळेत प्रथम येण्याचा मान मिळवला. तिच्या या यशात शरदचंद्रजी पवार होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजच्या प्रोफेसर तिची आई डॉ. दर्शनी गिरमे यांचा मोठा मोलाचा वाटा आहे.

तिला शाळेच्या प्राचार्या जयश्री मेहत्रे, सहशिक्षक लिमकर सर, सुमित राज सर व सर्व शिक्षक वृंद यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. तिच्या या यशाबद्दल तिचे माजी आ. डॉ. सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे, डॉ. आर. आर. धूत, माजी जिल्हा विशेष समाज कल्याण अधिकारी रफिक मुन्शी, शरदचंद्रजी पवार होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल श्रीरामपूरचे प्राचार्य डॉ. रिझवान अहमद इत्यादींनी अभिनंदन केले.

# जेऊर येथील बायजामाता यात्रोत्सवाची जय्यत तयारी

नगर - नगर तालुक्यातील जेऊर गावचे ग्रामदैवत देवी बायजामातेचा यात्रोत्सव २३ मे पासून सुरू होत आहे. यात्रोत्सवा दरम्यान विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रोत्सवात मागील वर्षी दोन गटात झालेल्या दगडफेकीच्या पार्श्वभूमीवर कडक पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

जेऊर गावचे ग्रामदैवत देवी बायजामाता जागृत देवस्थान म्हणून राज्यात प्रसिद्ध आहे. देवीचा यात्रोत्सव सालाबाद प्रमाणे वैशाख बुद्ध पौर्णिमेला भरत असतो. देवीची आख्यायिका प्रसिद्ध असून यात्रोत्सव काळात संपूर्ण राज्यातून भक्त भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येत असतात. त्यामुळे यात्रोत्सव समिती व ग्रामस्थांच्या वतीने यात्रोत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली आहे.

गुरुवार (दि. २३) रोजी देवीला गंगेच्या पाण्याचा जलाभिषेक, कावड मिरवणूक होणार आहे. संध्याकाळी पालखी (छबीना) मिरवणूक, शोभेची दारू त्यानंतर लोकनाट्य तमाशाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवारी कलावंतांच्या हजेऱ्यांचा कार्यक्रम, वांगे भाकरीचा महाप्रसाद व कुस्त्यांचा हगामा तर शनिवारी

### यात्रोत्सवसमितीकडून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन



वांगे भाकरीचा महाप्रसाद, कुस्त्यांचा हगामा पार पडणार आहे. यात्रोत्सव तीन दिवस चालत असतो. येथील वांगे भाकरीचा महाप्रसाद प्रसिद्ध असून दोन दिवस कुस्त्यांचा हगामा यात्रेचे मुख्य वैशिष्ट्य आहे. याबरोबरच विविध सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत. यात्रोत्सवासाठी रहाडगाडगे, खेळणीचे दुकाने आले असून चालू वर्षी यात्रोत्सव मोठ्या प्रमाणात भरणार असल्याचा अंदाज ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

ग्रामस्थांच्या वतीने लोकसहभागातून देवीच्या मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात आला आहे. पवित्र सीना नदीच्या तीरावर गर्भगिरीच्या उंच टेकडीवर असलेले देवीचे हेमाडपंथी मंदिर आकर्षक दिसत आहे. मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे. यात्रोत्सवा दरम्यान येणाऱ्या भक्त भाविकांना सर्व सुविधा पुरविण्यासाठी यात्रोत्सव समिती व ग्रामस्थ प्रयत्नशील आहेत. देवीचे भगत म्हणून परंपरेने गावातील म्हस्के कुटुंबांना मान आहे. तर देवीच्या पालखीच्या मिरवणुकीचा मान पवार पाटलांना आहे. दरवर्षी पवार पाटलांच्या वाड्यातून पालखीची मिरवणूक निघत असते. तरी जेऊर यात्रोत्सवाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन समस्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

### यात्रोत्सवासाठी कडक बंदोबस्त

मागील वर्षी यात्रोत्सवात दोन गटात तुफान दगडफेक होऊन यात्रोत्सवाला गालबोट लागले होते. त्या पार्श्वभूमीवर कडक बंदोबस्त ठेवण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली. तसेच यात्रोत्सव काळात अनुचित प्रकार करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा इशारा पोलिसांच्या वतीने देण्यात आला आहे.

# नगरच्या 'रेणुका ट्रॅव्हल्स'च्यावतीने लोकाग्रहास्तव माहूर-शेगांव दर्शन

## श्री जगन्नाथपुरी येथे श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यासमवेत सहलीचेही आयोजन

नगर - श्री रेणुका ट्रॅव्हल्स सर्व्हिसेस यात्रा कंपनीतर्फे खास लोकाग्रहास्तव माहूर-शेगाव दर्शन व श्रीक्षेत्र जगन्नाथपुरी (चारधाम पैकी एक) येथे सहलीचे आयोजन हे श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यासमवेत करण्यात आले आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या पद्धतीने पर्यटकांची नोंदणीही सुरु झाली आहे, अशी माहिती संचालिका सौ. शुभांगी क्षीरसागर यांनी दिली.

१० ते १२ जून दरम्यान होणाऱ्या ३ दिवसांच्या माहूर-शेगांव दर्शन यात्रेमध्ये भाविकांना शेगांव-गजानन महाराज दर्शन, लाड कारंजे (नृसिंह सरस्वती जन्मस्थान), माहुरगड-रेणुकामाता दर्शन, देवगड-दत्तदर्शन इ. या ठिकाणी दर्शन घेता येईल. ही यात्रा २ बाय २ पुशबॅक सिट एअर सस्पेन्शन लक्झरी ४८ सीट एसी बसने होणार आहेत.

१० ते २१ नोव्हेंबर अशी १२ दिवसाची यात्रेत श्रीक्षेत्र जगन्नाथपुरी (चारधाम पैकी एक) याचे आयोजन करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर येथील भागवताचार्य हरिभक्त परायण जयंतमहाराज नांदेडकर यांच्या मधुर वाणीतून होणार आहे. सहभागींना हॉटेल स्वस्तिक मंडप, बडाशंख ग्रॅण्ड रोड, जगन्नाथपुरी (ओडीसा) येथे श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ ऐकावयास मिळण्याची ही सुवर्णसंधी आहे. या यात्रेमध्ये १० नोव्हेंबर रोजी यात्रा आरंभ होणार असून, १२ नोव्हेंबर रोजी भागवत कथा आरंभ होऊन १८ नोव्हेंबरला कथा सांगता असणार आहे. १९ रोजी जगन्नाथपुरी प्रेक्षणिय स्थळे, कोणार्क सूर्य मंदिर, साक्षी गोपाल, चंद्रभागा बीच, भुवनेश्वर, चिलका सरोवर आदि दर्शनाचा लाभ भाविकांना मिळणार आहे.

ही यात्रा रेल्वेने होणार आहे. रेल्वे बुकींग अंतिम तारीख ३० जूनपर्यंत असणार आहे. रेणुका ट्रॅव्हल्समार्फत याआधी आयोजित केलेल्या भागवत कथेचे कुरवपुर येथे व दुसऱ्या भागवत कथेचे शुकताल येथे नियोजन केले होते. या दोन्ही भागवत कथेसाठी भाविकांनी उत्तम प्रतिसाद दिला होता.

या दोन्ही यात्रेसाठी आगाऊ व त्वरित नावनोंदणी आवश्यक आहे. प्रथम येणाऱ्या प्रथम प्राधान्य देण्यात येणार आहे. यात्रेसाठी भाविकांनी बुकींग करावे, असे आवाहन संयोजक श्यामकांत क्षीरसागर यांनी केले आहे. पर्यटकांच्या संपूर्ण सुरक्षेची काळजी घेण्यात येते. श्री रेणुका ट्रॅव्हल्समार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या सहलींसाठी मर्यादित जागा असल्याने सर्वांची व्यवस्थित सोय होते. सहलीमध्ये स्वतः आयोजक पती-पत्नी तसेच त्यांचा कर्मचारीवर्ग सहभागी होतात. राहण्याची उत्तम सुविधा, घरगुती पद्धतीचे जेवण तसेच वृद्धांची काळजी घेतली जात असल्याचे सौ. दिपा जोशी यांनी माहिती देताना सांगितले.

वाजवी तसेच रास्त दर असल्याने ही कंपनी अल्पकाळात लोकप्रिय ठरली असल्याचे श्यामकांत क्षीरसागर यांनी सांगितले.

सहलींमध्ये सहभागी होण्यासाठी व अधिक माहितीसाठी रेणुका ट्रॅव्हल्स सर्व्हिसेस (शॉप नं. ३, नीलम प्रोव्हिजन स्टोअर्सशेजारी, पोलिस कॉलनी, कुष्ठधाम रोड, डॉ. पानसंबळ हॉस्पिटलमागे, सावेडी, अहमदनगर) मो. क्रमांक ९९२२२४०५१५ व ९४०५०३२६९८ आणि सौ. दिपा जोशी (मो. ८३७९८४१२६१, ९४०४४०१६९९) येथे नाव नोंदवावे.

# फ्रि करिअर कौन्सिलींग - दहावी/बारावी नंतर काय

नगर- दहावीची / बारावीची परिक्षा दिलेल्या बहुसंख्य विद्यार्थ्यांना भविष्यात यशस्वी होण्यासाठी कोणते क्षेत्र निवडावे हा प्रश्न भेडसावत आहे तसेच ज्या विद्यार्थ्यांना इयत्ता अकरावी / पदवीमध्ये कोणत्या शाखेत प्रवेश घ्यायचा हे ठरलेले आहे, त्यांना देखील त्या शाखेतील विविध संधीची परिपुर्ण माहिती नाही. बऱ्याच शाळा / महाविद्यालय किंवा सामाजिक संस्था याविषयी व्याख्याने आयोजित करतात व त्यातुन उत्तम माहितीही सांगितली जाते.

दहावी/बारावी नंतर तुम्ही कोणती शाखा निवडता व कुठे शिकता यावर बरेच अवलंबुन असते. या संदर्भातील तज्ञांच्या प्रत्यक्ष भेटीत विद्यार्थी व पालकांचे संपुर्ण शंका निरसन झाल्यास यशस्वीतेच्या दृष्टीने कुठे प्रवेश घ्यायचा हे ठरविणे सोपे जाईल.

जिवन ज्योत मेडिकल फोंडेशनचे जिवन ज्योत ज्युनिअर कॉलेज व बॉम्बे इन्स्टिटयूट ऑफ व्होकेशनल ट्रेनिंग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना याबाबतचे वैयक्तिक मार्गदर्शन मिळण्याची संधी उपलब्ध करुन देत आहोत. जिवन ज्योत मेडिकल फोंडेशनने आजपर्यंत अनेक विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृती बरोबर ज्ञान देवून घडविलेले आहे. १९९४ पासुन जिवनज्योत मेडिकल फौंडेशन अंतर्गत अनेक विद्यार्थी मेडिकल लॅब टेक्नीशियन, रेडीओलॉजी टेक्निशियन (एक्स रे, इ.सी.जी, सी.टी स्कॅन, एम आर. आय, सोनोग्राफी, कॅथलॅब, डायलॅसिस), फिजीओथेरापी, नर्सिंग व ऑपरेशन थिएटर असिस./ टेक्निशिअन, कॉम्प्युटर टेक., बांधकाम पर्यवेक्षक (स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक) झाले आहेत.

जिवन ज्योत ज्युनिअर कॉलेज व बॉम्बे इन्स्टिटयूट ऑफ व्होकेशनल ट्रेनिंग यांचे अंतर्गत अनेक विद्यार्थी पॅरामेडिकल, व्यावसायिक व तांत्रिक कोर्सेस करुन आपले भविष्य उज्वल केलेले आहे.

पॅरामेडिकलमध्ये डि. एम. एल. टी, रेडीओलॉजी (एक्स रे, इ.सी.जी, सी.टी स्कॅन, एम आर. आय, सोनोग्राफी, कॅथलॅब, डायलॅसिस), फिजीओथेरापी, नर्सिंग व ऑपरेशन थिएटर टेक्निशिअन अभ्यासक्रम व व्यावसायिक मध्ये बांधकाम पर्यवेक्षक (स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक) व तांत्रिक मध्ये कॉम्प्युटर टेक्निक, इ. विषयांचा अभ्यास व अनुभव दांडगा आहे. याचा फायदा विद्यार्थ्यांना व्हावा या दृष्टीने नगरकरांना हि संधी मिळत आहे.

विद्यार्थी अथवा पालक खाली दिलेल्या नंबरवर कॉल करु शकता किंवा जिवन ज्योत मेडिकल फोंडेशनचे जिवन ज्योत ज्युनिअर कॉलेज व बॉम्बे इन्स्टिटयूट ऑफ व्होकेशनल ट्रेनिंग, बॉम्बे हॉस्पीटल / बॉम्बे बेकर्स समोर, वनविभाग ऑफीस मागे, नगर औरंगाबाद रोड, अहमदनगर मध्ये २१ ते २४ मे सकाळी ११.०० ते दुपारी २.०० च्या दरम्यान येवुन प्रत्यक्ष भेटीत माहिती मिळवू शकता. विद्यार्थी व पालकांनी याचा लाभ घ्यावा व आपल्या पाल्याचे भविष्यासाठी योग्य मार्गदर्शन मिळवावे. माहितीसाठी मो. नं. ८८३०६८५७३२ किंवा ९३७३५६०४५२ या नंबरवर संपर्क साधावा,



### मारुती सुझुकीच्या स्विफ्ट कारचे अनावरण

मारुती सुझुकीने लॉन्च केलेल्या चौथ्या जनरेशनची स्विफ्ट कारचे अनावरण नगर मारुती सुझुकीच्या कांकरिया ऑटोमोबाइल्स अरेना शोरुममध्ये आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी एसबीआयचे रिजनल मॅनेजर सूर्यनारायण पांडे, सुरेश कांकरिया, सत्यम कांकरिया, स्नेहा कांकरिया, साधना कांकरिया आदी.

# गॅलेक्सी नॅशनल स्कूलचा सिबीएसई बोर्डाच्या १०वीचा निकाल शंभर टक्के

### भव्य मवाळ शाळेत सर्वप्रथम

नगर - वडगावगुप्ता येथील गॅलेक्सी नॅशनल स्कूलचा सिबीएसई बोर्डाच्या १० वी परिक्षेचा निकाल सालाबाद प्रमाणे १०० टक्के लागला असून भव्य मवाळ हा विद्यार्थी ९३.४ टक्के गुण मिळवून शाळेत सर्वप्रथम आला आहे. तसेच अनेक विद्यार्थ्यांनी ९० टक्या पेक्षा अधिक गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे. स्कूलमधील उच्चश्रेणीने उत्तीर्ण झालेल्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.रवींद्र साताळकर व कार्यकारी विश्वस्त उषा देशमुख यांनी अभिनंदन केले आहे.



गॅलेक्सी नॅशनल स्कूलचा सिबीएसई बोर्डाच्या १० वी परिक्षेचा निकाल १०० टक्के लागला असून शाळेत प्रथम आलेल्या भव्य मवाळ या विद्यार्थ्याचे कौतुक करताना संस्थेच्या विश्वस्त उषा देशमुख व संचालिका देविका देशमुख. यावेळी प्रिन्सिपल क्षितीजा हडप, व्हाईस प्रिन्सिपल अनिता गागरे व पालक.

सिबीएसई १०वी बोर्डाच्या परिक्षेत उच्चश्रेणीने उत्तीर्ण पहिले पाच विद्यार्थी असे भव्य मवाळ, सार्थक दिक्षीत, नील दासवानी, हृषिकेश ढगे व क्रिश सुंभे. सर्व विद्यार्थ्यांचे शाळेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव सम्राट देशमुख, विश्वस्त देविका देशमुख, प्रिन्सीपल क्षितीजा हडप, व्हाईस प्रिन्सिपल अनिता गागरे, पालक संगीता मवाळ, गिरधारी मवाळ, उषा देशमुख, तमन्ना रोहीडा, प्रा. विनय शितोळे आदींसह विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक उपस्थित होते.

यावेळी विश्वस्त उषा देशमुख म्हणाल्या, स्कूलची १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखत विद्यार्थ्यांनी खूप मोठे यश संपादन केले आहे. वर्षभर विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मेहनतीचे चीज झाले आहे. शाळेतील शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन व विद्यार्थ्यांनी घातलेल्या मेहनतीमुळेच हे यश मिळवता आले आहे.

# जिल्हा मराठा हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची परदेशात उत्तुंग भरारी

नगर - जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अॅड कॅटरिंग टेकनॉलॉजी, अहमदनगर या महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना ऑस्ट्रेलिया, अमेरिका, न्युझीलॅण्ड, दुबई, मॉरिशस, मालदीव, कॅनडा व इतर देशातील विविध पंचतारांकित हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, मोटेल, ट्रॅव्हल कंपनीमध्ये नोकरी मिळाली असून, विद्यार्थी नोकरीसाठी रुजू झाले आहेत. यामध्ये प्रामुख्याने ऑस्ट्रेलिया, अमेरिकेमध्ये नोकरी मिळणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक आहे.




अमेरिकन पंचतारांकित हॉटेलमध्ये रितेश दंडवते, ऋषभ घोडके, संकेत आढाव, आयुब शेख, प्रथम बनसोडे, सोमेश्वर स्वामी, निशांत परदेशी, निनाद अस्वर, रोहित धुमाळ, चक्रधर जगताप या विद्यार्थ्यांची मुलाखतीद्वारे निवड झाली. अत्यंत अवघड असणारा अमेरिकन वर्क व्हिजा त्यांना प्राप्त झाला व ते अमेरिकन हॉटेल्समध्ये कार्यरत आहेत.

ऑस्ट्रेलियाच्या फाइव्ह स्टार हॉटेल्स आणि रेस्टॉरंटमध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी साईनाथ लांडे, अभिषेक चुंबळकर, प्रकाश सावंत, कु. शुभांगी मुसमाडे, रियाज शेख, इत्यादी विद्यार्थी यावर्षी मुलाखतीद्वारे निवडले व त्यांना ऑस्ट्रेलियन विजा प्राप्त झाला व ते ऑस्ट्रेलियन हॉटेल्समध्ये सध्या कार्यरत आहेत.

आखाती देशातील दुबई या शहरांमध्ये शेख उवेझ व कु. अनुजा उनवणे यांची निवड मुलाखतीद्वारे झाली व दोघेही तेथे यशस्वीरित्या कार्यरत आहेत न्युझीलँड येथील पंचतारांकित हॉटेलमध्ये रितेश खटके हा विद्यार्थी मुलाखतीद्वारे निवड होऊन सध्या कार्यरत आहे.

जिल्हा मराठा हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालयातून हॉटेल मॅनेजमेंटचा पदवी अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर अनेक विद्यार्थी भारतातील ताजमहल हॉटेल, ओबेराय हॉटेल्स, मेरियत हॉटेल्स, हयात हॉटेल्स तसेच रेस्टॉरंटमध्ये देश विदेशात यशस्वीरित्या सुपरवायझरपासून मॅनेजर लेव्हलपर्यंत कार्यरत आहेत.

संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव अॅड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयंतराव वाघ, खजिनदार श्रीमती अॅड. दीपलक्ष्मी म्हसे पाटील आणि सर्व विश्वस्त, महाविद्यालयाचे संचालक प्रा. डॉ. नंदकुमार जगताप, महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ. योगिता सद्रे, विभाग प्रमुख प्रा. बाळासाहेब शेंडगे, आयक्यूएसीचे समन्वयक प्रा.गोकुळ सोनवणे, ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट सेलचे प्रा.सागर माळवदे, प्रा. रचना खटावकर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आंतरराष्ट्रीय बुद्धीबळ स्पर्धेत नगरच्या देवेंद्र वैद्यचा विजय

नगर - अहमदनगर येथील देवेंद्र वैद्य यांनी २५ व्या आंतरराष्ट्रीय बुद्धीबळ स्पर्धेमध्ये कर्णबधिर (दि डेफ) मध्ये देशामध्ये प्रथम क्रमांकाने विजय प्राप्त केला. याबद्दल मंगेश केवळ साई हेअरिंग क्लिनिक यांनी त्याचा सत्कार करून कौतुक केले.

देवेंद्र वैद्य यांची निवड जूनमध्ये सायबेरिया येथे होणाऱ्या 'वर्ल्ड चेस डेफ चैंपियन' स्पर्धेसाठी झाली आहे. वैद्य हा लहानपणापासून श्रवणयंत्राचा वापर करीत आहे. त्याच्या श्रवणयंज्ञाची पूर्ण देखभाल साई हेअरिंग क्लिनिकमधून झाली आहे. त्याची जागतिक बुद्धीबळ स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल साई हेअरिंग क्लिनिकचे संचालक मंगेश केवळ व नितांत केवळ यांनी त्यास शुभेच्छा दिल्या.




आंतरराष्ट्रीय बुद्धीबळ स्पर्धेत प्रथम क्रमांकाने विजयी झालेल्या देवेंद्र वैद्यचा सत्कार करताना साई हेअरिंग क्लिनिकचे मंगेश केवळ.



### मंगल भक्त सेवा मंडळातर्फे भिक्षा झोळी समाधी सोहळा

मंगल भक्त सेवा मंडळाच्या वतीने मंगल दत्त क्षेत्रात सद्‌गुरू शंकर महाराज समाधी सोहळा उत्साहात झाला. यावेळी स्वामी विश्वेश्वर महाराज यांनी भिक्षा झोळी फिरवली.

# 'फॅशन डिझायनिंग'मध्ये नगरच्या सौंदर्या नांदूरकरचे देशपातळीवर यश

नगर - येथील कु.सौंदर्या जितेंद्र नांदूरकर हीने नॅशनल इंडस्ट्रिज् ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी संस्थेच्यावतीने घेण्यात आलेल्या परिक्षेत देश पातळीवर २२१ क्रमांक पटकाविला. पुणे येथील एक्सल डिझाईन स्टुडिओचे अंकित कुमार, आजी मोहिनी नांदूरकर यांचे मार्गदर्शन लाभले. या स्पर्धेत देशभरातून सुमारे ७ लाख विद्यार्थी सहभागी झाले होते. सराफ बाजार येथील अशोक दत्तात्रय नांदूरकर यांची नात आहे.



### चुकीची दुरुस्ती

दैनिक नवा मराठा या अंकात दि. १७.५.२०२४ रोजी अॅड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे, अॅड. ओंकार पंडीत मोरे यांच्या जाहीर नोटीसीम ध्ये नजरचुकीने मौजे केडगाव येथील शेत जमिनीचा गट नं. ३५३ / ९ ते ११ याचे क्षेत्र १हे. ०३आर. असे झाले आहे. त्याऐवजी शेत जमिनीचा गट नं. ३५३/१ ते ११ याचे क्षेत्र १ हे. ०३ आर असे वाचावे याची नोंद घ्यावी.

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात

दिनांक : 17 ते 24 मे 2024




| | |
|---|---|
| किंग्डम ऑफ द फ्लॅनेट ऑफ एप्स हिंदी/इंग्लीश | 8.45 AM, 4.35 PM, 8.00 PM |
| श्रीकांत | 8.30 AM, 2.45 PM, 7.30 PM 10.50 PM |
| क्रु 5.20 PM | मैदान 11.15 AM |
| भुंडीस (मराठी) | 1.50 PM |
| नाच ग घुमा (मराठी) | 8.15 AM, 11.30 AM 2.30 PM, 7.45 PM, 10.15 PM |
| जुन फर्निचर (मराठी) | 10.55 AM, 4.35 PM 8.00 PM |

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking

Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !

AVAILABLE ON bookmyshow CONNPLEX SMART THEATRE AVAILABLE ON bookmyshow

3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001




## गरोदरपणात यूव्ही थेरेपी ?

विचारा प्रश्न


माझी ३६ वर्षांची मैत्रीण गरोदर आहे. त्यातच तिला व्हिटिलिगो हा विकार झाला आहे. याबाबत तिने त्वचा तज्ज्ञांचा सल्ला घेतला. त्यांनी तिला यूव्ही लाईट थेरपीचा सल्ला दिला आहे. गरोदरपणाच्या काळात ही थेरपी घेता येईल, असं डॉक्टरांचं म्हणणं आहे. त्यांचं म्हणणं योग्य आहे का? माझी मैत्रीण यूव्ही थेरेपी घेऊ शकते का?

**उत्तर** : यूव्ही थेरपी ही अत्यंत सुरक्षित अशी उपचारपद्धती आहे. व्हिटिलिगोचे कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत. शरीरातल्या कोणत्याही अवयवाला यामुळे त्रास होत नाही. पण यामुळे मानसिक त्रास होऊ शकतो. थोडी अस्वस्थता जाणवू शकते. या विकारावर तातडीने उपचार घेण्याची काहीच गरज नाही. प्रसूती झाल्यानंतरही यावर उपचार घेता येतील. त्यामुळे काळजीचं काहीच कारण नाही. ०००



## मलेरियाने दर दोन मिनिटाला मृत्यू

**डेंगी, मलेरिया यासारखे आजार डास चावल्यामुळे होतात हे सर्वांना माहीत आहे. हे आजार टाळता येण्याजोगे आणि पूर्णपणे बरे होऊ शकणारे आजार आहेत; पण तरीही मलेरियाच्या नावाने आजही धडकी भरते. त्याला कारणही तसेच आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्यामाहितीनुसार मलेरियाने दर दुसऱ्या मिनिटाला एका मुलाचा मृत्यू होतो, तर दर वर्षी मलेरियाच्या २० कोटी प्रकरणांची नोंद होते.**



डॉ. अंजिक्य बोऱ्हाडे

गेल्या दशकात मलेरिया निर्मूलनासाठी अनेक प्रयत्न केले गेले. २०१५ पासून मलेरियाविरोधी मोहीम सुरू करण्यात आली आहे. जागतिक आरोग्य संघटनेने २०१८ मध्ये आपला 'ग्लोबल मलेरिया रिपोर्ट' सादर केला. ताज्या माहितीनुसार, २०१५ ते २०१७ वर्षांत मलेरिया रुग्णांच्या संख्येमध्ये कोणतीही घट झालेली नाही. सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार गेल्या पाच वर्षात मलेरियामुळे ७८ हजार रुग्णांचा मृत्यू झाला आहे, तर ७२ हजारांपेक्षा अधिक रुग्णांना मलेरियाची लागण झाली आहे. हा आजार झाल्यानंतर वेळीच काळजी घेणे आवश्यक आहे. अन्यथा हा आजार जीवघेणा ठरतो.

ॲनाफिलीस डासाच्या प्रजातीमधील मादी डासामुळे हा आजार होतो. ही मादी डास साठवलेल्या पाण्यामध्ये वास्तव्य करून अंडी घालत असल्यामुळे या आजाराचा त्रास होऊ नये म्हणून या डासांची उत्पती स्थळे नष्ट करुन परिसर स्वच्छ ठेवणे गरजेचे आहे. या आजारांमध्ये रुग्णाच्या शरीरामध्ये रक्तामधील प्लेटलेट्स देखील कमी होतात.

ताप, डोकेदुखी आणि थंडी ही मलेरियाची प्राथमिक लक्षणे असून मलेरियाचा डास चावल्यानंतर १०-१५ दिवसांत ही लक्षणे दिसतात. ही लक्षणे कधीकधी सुप्त किंवा कमी तीव्रतेची असतात आणि पटकन लक्षात येत नाही; मात्र त्यावर २४ तासांमध्ये उपचार न केल्यास जीवाला धोकाही निर्माण होऊ शकतो. पाच वर्षांखाली मुलांना मलेरियाचा सर्वाधिक धोका असतो. २०१७ मध्ये जगभरात मलेरियाने झालेल्या मृत्यूंमध्ये ६१ टक्के प्रमाण हे पाच वर्षांखालच्या मुलांचे होते. तसेच गरोदर महिला आणि रोगप्रतिकारशक्ती कमी असणाऱ्यांना देखील मलेरिया होण्याची शक्यता जास्त असते.

## तंबाखू खाण्यात भारत जगात दुसरा!

**जगात सर्वात जास्त तरुणवर्ग भारतात आहे; पण हाच तरुणवर्ग व्यसनाच्या विळख्यात अडकला आहे. आपल्या देशात तंबाखू सेवन करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. तंबाखू खाणे आरोग्यास हानीकारक आहे, असा इशारा दिला जातो; पण यानंतरही तंबाखूजन्य पदार्थांचा वापर वाढत चालला आहे. जगात तंबाखूचे सेवन करण्यात दुसरा क्रमांक भारताचा लागतो.**



डॉ. सतीश सोनवणे

'केपी.एम.जी. इन्शुरन्स अँड कन्सल्टिंग सर्व्हिसेज 'एलएलपी'ने तयार केलेल्या एका अहवालामध्ये ही चिंताजनक बाब समोर आली आहे. खैनी, गुटखा, सुपारी, तंबाखू, जर्दा, बिडी, सिगरेट आणि हुक्का सारख्या उत्पादनांच्या सेवनात मोठी वाढ झाल्याचे या अहवालामध्ये नुमद करण्यात आले आहे. भारतामध्ये धुम्रपान किंवा तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनने दर वर्षी दहा लाख लोकांचा मृत्यू होता. या आकडेवारीत गेल्या ३० वर्षात ५८.९ टक्के वाढ झाली आहे.

भारतात तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे १९९० मध्ये सहा लाख लोकांचा मृत्यू झाला होता. २०१९ मध्ये हाच आकडा वाढून १० लाखांवर पोहोचला आहे. आता जागतिक आरोग्य संघटनेने जाहीर केलेल्या अहवालामध्ये जगभरात तंबाखूच्या वापरामुळे दर वर्षी जवळपास १०५.४ कोटी रुपयांचा खर्च होत असल्याचं समोर आले आहे. हा खर्च तंबाखूमुळे आजारा पडलेल्या लोकांच्या उपचारांवर खर्च होत आहे. देशात तंबाखूचे सेवन करण्यात मिझोरम हे राज्य पहिल्या स्थानावर आहे. मिझोरममध्ये तब्बल ६७ टक्के लोक तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करतात, तर सर्वात कमी म्हणजे नऊ टक्के तंबाखूचा वापर गोव्यात होतो. अहवालानुसार, महिलांमध्येही तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामध्ये वाढ झाली आहे. प्रत्येक सहावी महिला कोणत्या ना कोणत्या स्वरूपात तंबाखूचे सेवन करते. अनेक महिला मजूर गुटखा, खैनी, विडी यांचे सेवन करतात तर काही महिला सिगारेट ओढणे, गुटखा खाणे स्टेटस म्हणून सुरू करतात आणि त्यानंतर व्यसनाला बळी पडतात.

तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनाने माणसाच्या आरोग्यावर अनेक दुष्परिणाम होतात. यात सर्वात मोठा धोका असतो तो कॅन्सर अर्थात कर्करोगाचा. तंबाखूमुळे तोंडाचा, ओठाचा, जबड्याच्या, फुफ्फुसाचा, घशाचा, पोटाचा, किडनीचा आणि मूत्राशयाचा कर्करोग होण्याची भीती असते. यापैकी भारतामध्ये तंबाखू सेवनामुळे तोंडाचा कॅन्सर होणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. धुम्रपानामुळे फुफ्फुसाचा कॅन्सर होण्याचे प्रमाण वाढते आहे. तंबाखूमुळे छातीत दुखणे, हृदयविकार झटका येणे, रक्तवाहिन्याचे विकार इत्यादी रोग जडतात. धूम्रपानामुळे टी.बी. सुद्धा होऊ शकतो. ०००

## जिममधल्या व्यायामानंतर...

आपण कुठे चुकतो?

जिममध्ये जाऊन घाम गाळताना प्रचंड मेहनत करावी लागते. पण जिममधल्या व्यायामानंतर आपण काही गोष्टींकडे दुर्लक्ष करतो. यामुळे व्यायामाचा काहीच लाभ होत नाही. जिममधल्या व्यायामानंतर काय करायला हवं याविषयी...

✻ जिममध्ये व्यायाम केल्यानंतर शरीर ताणण्याचे व्यायाम करायला हवेत. इतकंच नाही, तर शरीराला सर्वसामान्य पातळीवर आणायला हवं. व्यायाम करताना स्नायूंवर बराच ताण येतो. त्यांचा आकार बदलतो. व्यायामानंतर शरीर ताणण्याचे व्यायाम केल्याने स्नायू आपल्या मूळ स्थितीत परत येतात. व्यायाम केल्यानंतर शरीराचं तापमान वाढतं. रक्तदाब आणि हृदयगतीही वाढलेली असते. त्यामुळे शरीर सामान्य पातळीवर आणणं गरजेचं असतं.

✻ आहारातल्या कॅलरींची काळजी करणारे अनेकजण व्यायामानंतर पोषक आहार घेत नाहीत. व्यायामानंतर शरीराला पोषक घटकांची सर्वात जास्त आवश्यकता असते. त्यामुळे फळं, भाज्या, डाळी, कडधान्य असा आहार घ्यायला हवा. शरीराला योग्य असलेले पदार्थ खाणं गरजेचं आहे. तेलकट पदार्थ खाणं टाळायला हवं. तसंच व्यायाम केला म्हणून शरीरावर जंक फूडचा मारा करू नये.



✻ व्यायामादरम्यान शरीरातलं पाणी कमी होतं. यासोबतच मीठ आणि इतर पोषक घटकही घामावाटे बाहेर पडतात. त्यामुळे व्यायामानंतर भरपूर पाणी प्यायला हवं. तसंच नारळ पाणी, फळांचे रस, ग्रीन टी, चॉकलेट मिल्क, ताक अशी पेयंही पिता येतील.

✻ व्यायामानंतर शरीरातचं तापमान प्रचंड वाढलेलं असतं. हे तापमान पुन्हा पूर्वीसारखं होईपर्यंत थंड पाण्याने आंघोळ करू नका. व्यायामानंतर लगेच थंड पाण्याने आंघोळ केली तर हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. त्यामुळे व्यायामानंतर साधारण अर्ध्या तासाने आंघोळ करावी.

✻ व्यायामानंतर शरीराला प्रथिनांची गरज असते. पण ही गरज तासाभरासाठीच असते. त्यानंतर आपल्या पचनसंस्थेला योग्य आहाराची गरज असते. त्यामुळे फक्त प्रोटीन शेक किंवा जेवणाच्या पर्यायी गोष्टींवर अवलंबून राहू नका. पोषक आहार घ्या.

✻ व्यायामानंतर आरामही गरजेचा असतो. त्यामुळे थोडीशी झोप काढायला हरकत नाही. सोफ्यावर बसून राहणं, काही तरी खात राहणं किंवा आवडती मालिका बघणं हा आरामाला पर्याय असू शकत नाही. त्यामुळे थोडा वेळ डोळे बंद करून पडा. यामुळे स्नायूंनाही आराम मिळेल. ०००

## धोके मोबाईल गेमच्या व्यसनाचे

तंत्र आरोग्याचे

मोबाईल गेमचं व्यसन अनेकांना असतं. त्यातही तरूण आणि लहान मुलांना याचं व्यसन लवकर लागतं. मोबाईलवर नवनवे गेम येत असतात आणि आधी त्याची सवय आणि मग त्यांचं व्यसन कसं लागतं हे कळतच नाही. फोर्टनाईट या गेमने अनेकांना वेड लावलं आहे. या गेमचे परिणाम आणि दुष्परिणाम याबाबत चर्चा होत असली तरी घरातल्या लहान मुलांवर पडलेला त्याचा प्रभाव चिंतेचं कारण असू शकतो. या गेम्सच्या स्वरूपामुळे लोकांना त्यांची सवय लागून जाते. गेम खेळल्याशिवाय चैन पडत नाही. गेम खेळताना आयुष्यातल्या इतर गोष्टी मागे पडतात. मुलं अभ्यास करत नाहीत, घरातली कामं करत नाहीत. वैयक्तिक स्वच्छतेकडे लक्ष देत नाहीत. खाण्याकडे त्यांचं लक्ष नसतं. घरच्यांसोबत किंवा मित्र-मैत्रिणींसोबत बाहेर जात नाहीत. महत्त्वाचं म्हणजे मैदानी खेळ खेळत नाहीत. या सगळ्याचा त्यांच्या जडणघडणीवर दूरगामी परिणाम होऊ शकतो.



या गेम्सचं व्यसन जडलं की मुलांची बरीच सामाजिक कौशल्यं कमी होतात. महत्त्वाची बाब म्हणजे मुलांचा इतरांशी असलेला संवाद कमी होतो. माणसांची आपल्याला गरज आहे असं मुलांना वाटत नाही. या गेम्सचा वापर मुलांची कौशल्यं वाढवण्यासाठी करता येतो. स्मरणशक्ती वाढवणं, एकाग्रता वाढवणं, भाषाज्ञान यासाठी गेम्सचा वापर करता येऊ शकतो. या गेम्सचा वापर मर्यादित काळासाठी केला तर ही उद्दिष्ट साध्य करता येऊ शकतात. मुलांना लागलेलं मोबाईल गेमचं व्यसन किंवा सवय ही अनेक पालकांची समस्या असते. यावर उपाय शोधण्याचाही त्यांचा प्रयत्न असतो. मुलांना लागलेलं मोबाईल गेमचं व्यसन कमी करण्यासाठी काय करता येईल याविषयी जाणून घ्यायला हवं.

मुलांचा गेम खेळण्याचा वेळ कमी करायला हवा. त्यांचं गेम खेळणं एकाएकी पूर्णपणे थांबवू नका. पण हळूहळू वेळ कमी करा. मुलांना इतर गोष्टींमध्ये रमवा. मुलांना विविध प्रकारची गॅझेट्स वापरू देऊ नका. मोबाईलवर मुलं कोणते गेम्स खेळतात ते बघा. व्यसन जडण्यासारखे गेम्स त्यांना खेळायला देऊ नका. शारीरिक मेहनत करावी लागेल अशा गेम्सची निवड करा. मुलांना वेळ द्या. त्यांच्याशी बोला. इतर छंद जोपासायला मदत करा. मुलं कुटुंबासोबत जास्तीत जास्त वेळ कसा घालवतील ते बघा. लहान वयाच्या मुलांना मोबाईल हाताळू देऊ नका. गेम्सचं जडलेलं व्यवसन किंवा सवयींकडे दुर्लक्ष करू नका. मानसोपचार तज्ज्ञ किंवा समुपदेशकांची मदत घ्या. मोबाईलवर गेम खेळण्याचं व्यसन लागल्याने वैयक्तिक आयुष्यावर परिणाम होऊ शकतो. मुलांचं आरोग्य धोक्यात येऊ शकतं. मुलं हिंसक आणि हट्टी बनू शकतात. त्यामुळे मुलांची ही सवय वेळीच सोडवा. ०००

## तरुणांमध्ये उच्चरक्तदाब मोठी समस्या

डॉ. महेश दळे

उच्च रक्तदाब ही आजच्या काळामधली मोठी समस्या आहे. चिंतेची बाब म्हणजे तरुणांमध्येही याचा त्रास वाढत आहे. 'कार्डिओलॉजी सोसायटी ऑफ इंडिया'च्या अहवालानुसार, भारतातील प्रत्येक पाच तरुणांपैकी एक तरुण हा उच्च रक्तदाबाचा बळी ठरत आहे. त्यानुसार भारतातील सुमारे आठ कोटी तरुण उच्च रक्तदाबाचे बळी आहेत. पाश्चिमात्य तरुणांच्या तुलनेत भारतीय तरुणांसाठी ही मोठी समस्या आहे. यामुळेच अलीकडच्या काळातमध्ये तरुण वयात हृदयविकाराचा झटका आणि पक्षाघात अशा घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे.

आपल्या शरीरातील सर्व अवयवांना कार्य करण्यासाठी भरपूर पोषक तत्वांची आवश्यकता असते. या पोषक तत्वांची पूर्तता करण्यासाठी, आपण दररोज अन्न आणि आरोग्यदायी गोष्टी खातो; परंतु हे पोषक घटक केवळ खाल्ल्याने आपल्या अवयवांचे पोषण होऊ शकत नाही. शरीरासाठी आवश्यक असलेले सर्व पोषक घटक रक्ताद्वारे आपल्या अवयवांपर्यंत पोहोचवले जातात. रक्त आपल्या शरीरातून वाहते, तेव्हा ते नसा आणि धमन्यांच्या कडांवर दबाव आणते. रक्तवाहिन्या आणि शिरा यांच्यावर पडणाऱ्या या दाबाला रक्तदाब म्हणतात. रक्तदाब खूप वाढला तर हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोक सारख्या गंभीर समस्या उद्भवू शकतात. त्यात रुग्णाचा तात्काळ मृत्यू देखील होऊ शकतो.

आजकाल तरूणाई पॅकबंद आणि प्रक्रिया केलेले पदार्थ खातात. यामध्ये जास्त प्रमाणात सोडियम असते. जास्त प्रमाणात सोडियमचे सेवन केल्याने शरीरात पाणी साचून रक्तवाहिन्यांवर दबाव येतो. तणावामुळे शरीरातील हार्मोन्सचा स्त्राव वाढतो. हार्मोन्स हृदयाचे ठोके वाढवतात आणि रक्तवाहिन्या अरुंद करतात. एखादी व्यक्ती दीर्घकाळ तणावाखाली राहिली तर शरीरात जळजळ होते. त्यामुळे रक्त वाहून नेणाऱ्या नसा खराब होतात. आजकाल बहुतेक लोक ऑफिसमध्ये नऊ तास डेस्क जॉब करतात. यामुळे शारीरिक हालचाली कमी होऊ लागतात आणि उच्च रक्तदाबाचा धोकाही वाढतो. कमी वेळ झोपणे, अति मद्यपान आणि सिगारेट यांसारख्या सवयींमुळेही रक्तवाहिन्या आकसतात. त्यामुळे उच्च रक्तदाबाची समस्याही तसेच हृदयविकाराचा धोकाही वाढतो. ०००

## हृदयविकाराच्या झटक्यानंतर...

आरोग्यमंत्र

हृदयविकाराचा झटका येण्याचं प्रमाण सध्या बरंच वाढलं आहे. वयाच्या तिशी, चाळीशीतही हृदयविकाराचा झटका आल्याचं पहायला मिळत आहे. हा झटका आपलं आयुष्य बदलून टाकतो, जगण्यावर बरीच बंधनं येतात. हृदयविकाराच्या झटक्यानंतर होणाऱ्या बदलांविषयी...



✻ हृदयविकाराचा झटका आल्यानंतरचे २८ दिवस खूप महत्त्वाचे असतात. या काळात हृदयक्रिया बंद पडून झटका आलेल्या रूग्णांचा मृत्यू होण्याचा धोका बराच वाढतो तसंच इतर गुंतागुंती निर्माण होण्याची शक्यताही जास्त असते. रूग्णालयातून घरी आल्यानंतरही उपचार सुरू ठेवावे लागतात.

✻ हृदयविकाराच्या झटक्यांची कारणं जाणून घेणं महत्त्वाचं असतं. हृदयविकाराचा झटका आलेल्या तरूणांसाठी तर हा मुद्दा खूप महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे डॉक्टरांचा सल्ला घेऊन तणावमुक्त आयुष्य जगण्याचा प्रयत्न करायला हवा.

✻ हृदयविकाराचा झटका अनेकांना मानसिक धक्का देतो. अशा घटनेनंतर रूग्ण आतून पूर्णपणे कोलमडून जातो. खूप अस्वस्थ होतो. अशा वेळी त्याला आधाराची गरज असते. आयुष्यावर बरीच बंधनं येतात. यामुळे काळजीत अधिकच भर पडते.

✻ हृदयविकाराचा झटका आल्यानंतर शारीरिक हालचालींवर मर्यादा येतात. सर्वसामान्य आयुष्य सुरू करण्याआधी शरीराला विश्रांतीची गरज असते. शारीरिक हालचालीची गरज असली तरी प्रत्येकाने आपल्या हृदयाचा आवाज ऐकायला हवा. धाप लागणं, चक्कर येणं अशा समस्या उद्भवत असतील तर डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा. शरीराला विश्रांती द्यायला हवी.

✻ हृदयविकाराच्या झटक्यानंतर रूग्णाच्या शरीरात गुंतागुंत निर्माण होते. अनेकांना छातीत जळजळ जाणवू शकते. काही खाल्ल्यावर हा त्रास जास्त प्रमाणात जाणवतो. छातीत जळजळलं किंवा दुखलं तर लगेच काळजी वाटायला लागते. पुन्हा हृदयविकाराचा झटका येईल की काय, हा विचार अस्वस्थ करून जातो. अशा वेळी हात जड होणं, तोंड कोरडं पडणं अशा समस्या उद्भवतात.

✻ हृदयविकाराच्या झटक्यानंतर वेळेत औषधं घेणं गरजेचं असतं.झटका येऊन गेल्यानंतर शारीरिक संबंधांमध्ये अडचणी येतील असं अनेकांना वाटतं. पण पुरेशा विश्रांतीनंतर सर्वसामान्य आयुष्य जगू लागल्यानंतर लैंगिक संबंधांमध्ये बाधा येत नाही. रूग्ण नीट चालत असेल किंवा दोन जिने चढल्यानंतर दम लागत नसेल तर नियमित लैंगिक संबंधांमध्ये कोणतीही अडचण येत नाही. ०००

नवसंशोधन


### मधुमेहामुळे वाढतो कॅन्सरचा धोका!



मधुमेहाचे बरेच धोके आहेत. त्यातच आता एका नव्या धोक्याची भर पडली आहे. मधुमेहींना कॅन्सर होण्याची शक्यता जास्त असल्याची बाब एक संशोधनातून समोर आली आहे. तसंच मधुमेहींचा कॅन्सर बरा होण्याची शक्यताही बरीच कमी असते असंही संशोधकांचं म्हणणं आहे. विविध प्रकारच्या कॅन्सरचा संबंध मधुमेहाशी जोडण्यात आला आहे. मधुमेहींमध्ये स्तनांच्या कॅन्सरची शक्यता पाच टक्क्यांनी अधिक असते. तसंच कॅन्सरचं निदान झालेल्या मधुमेहींमध्ये मृत्यूची शक्यताही बरीच जास्त असते. स्तनांच्या आणि प्रोस्टेट कॅन्सरमुळे होणाऱ्या मृत्यूची शक्यता मधुमेहींमध्ये २५ ते २९ टक्क्यांनी वाढते, असंही हे संशोधन सांगतं.

डोळ्यांचं आरोग्य

### मोतीबिंदू आहे?



मोतीबिंदू असलेल्या प्रौढांना ऑस्टिओपोरोसिस आणि हाड मोडण्याचा धोका असतो. एका संशोधनातून ही बाब समोर आली आहे. मोतीबिंदूचं निदान झाल्यानंतर रूग्णाचा ऑस्टिओपोरोसिस आणि हाड मोडण्याचा धोका २९ टक्क्यांनी वाढत असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. कॅल्शियमच्या कमतरतेमुळे ऑस्टिओपोरोसिस आणि मोतीबिंदूचा धोका वाढतो. त्यामुळे मोतीबिंदूचं निदान झालेल्या प्रौढांनी ऑस्टिओपोरोसिस आणि हाडांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

दंतारोग्य


### का राखावं तोंडाचं आरोग्य?



तोंडाचं आरोग्य आणि शारीरिक आरोग्य यांच्यात खूप जवळचा संबंध आहे. तोंडाचं आरोग्य राखलं नाही तर बऱ्याच विकारांना निमंत्रण मिळू शकतं. तोंडाच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केलं तर हृदयविकार, एंडोकार्डिटिस, वेळेआधी होणारी प्रसूती, जन्माच्या वेळी बाळाचं वजन कमी असणं अशा समस्या उद्भवू शकतात. तोंडातले बॅक्टेरिया रक्तवाहिन्यांमध्ये प्रवेश करून सर्वांगिण आरोग्य बिघडवू शकतात. त्यामुळे तोंडाच्या आरोग्याला महत्त्वाचं स्थान देणं गरजेचं आहे.

आजीबाईंचा बटवा

### लाभ गुलाबपाण्याचे...



गुलाबपाणी फक्त सौंदर्यवृद्धीसाठी उपयुक्त ठरतं असं नाही तर त्याचे इतरही अनेक लाभ आहेत. घसा खवखवत असेल तर डॉक्टर अँटीबायोटिक्स देतात. पण गुलाबपाण्याने घसा बरा होऊ शकतो. सर्दी, फ्लू, खोकला असेल तर गुलाबपाणी प्यावं. जंतूसंसर्गावरही गुलाबपाणी गुणकारी ठरतं. डोकं दुखत असेल तर गुलाबपाणी लावलेला रूमाल कपाळावर ठेवल्याने आराम पडू शकतो. पचनसंस्थेचं कार्य सुधारण्यासाठीही गुलाबपाणी उपयुक्त ठरतं. बद्धकोष्ठतेची समस्या असणाऱ्यांनीही गुलाबपाणी घ्यावं.

# शहर उपनगरातील ओढे व नाल्याची पावसाळयापूर्वी साफसफाई करावी

### माजी उपमहापौर गणेश भोसले यांची महापालिका आयुक्तांना निवेदनातून मागणी



नगर – पावसाळ्यापूर्वी महानगरपालिकेच्या हद्दीमधील ओढे व नाल्यांची साफ सफाई होणे गरजेचे असताना देखील अदयापपर्यंत त्याची सुरूवात करण्यात आलेली नाही. मागील पावसाळ्यातील घटनांचा अनुभव घेता साफसफाई होणे आवश्यक आहे अन्यथा मागील घटनांची पुनरावृत्ती होऊ शकते, यात मोठ्या प्रमाणात काही भागात पूरसदृश परिस्थिती निर्माण होऊन नागरिकांच्या घरात अक्षरशः पाण्याचे तळे साचल्याचे पाहायला मिळाले होते त्यामुळे नागरिकांच्या जीवनावश्यक वस्तूंचे मोठे नुकसान मनपाच्या बेजबाबदारपणामुळे झाले होते, हीच परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये याची मनपाने खबरदारी घ्यावी, तसेच सध्या अवकाळी पाऊस सुरू झालेला आहे. त्यात मोठ्या प्रमाणात गारपीट व पाऊस झाल्यास ओढे व नाले साफसफाई केलेली नसल्याने नागरीकांच्या घरामध्ये पाणी घुसून आर्थीक व जीवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महानगरपालिकेने जानेवारी / फेब्रुवारी महिन्यातच सदरील कामाची निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक होते. यामुळे एप्रिल महिन्यात ओढे व नाले साफसफाईच्या कामाची सुरूवात होवून १५ मे पर्यत काम पुर्ण करणे गरजेचे होते. परंतु कामास सुरूवात झालेली नाही. सध्याचा अवकाळी पाऊस व पुढील महिन्यापासुन सुरू होणारा पावसाळा विचारात घेवून पावसाळ्यात नागरीकांची गैरसोय होवू नये यासाठी तातडीने ओढे व नाले साफसफाईच्या कामास सुरूवात करण्यात यावी अशी मागणी माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी मनपा आयुक्त डॉ. पंकज जावळे यांच्याकडे निवेदनातून केली.

# महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करुन बांधकाम व्यावसायिकांची ओढ्या, नाल्यांवर अतिक्रमणे

### पावसाळ्यापुर्वीच्या उपाययोजना करा अन्यथा आंदोलन करणार : बजरंग दलाचा आयुक्ताना निवेदनाद्वारे इशारा

नगर – बांधकाम व्यावसायिकांनी अधिकाऱ्यांशी संगनमत करुन अतिक्रमणे केल्याने नागरिकांच्या घरात पाणी घुसते तुम्ही महापालिका हद्दीतील नैसर्गिक ओढे, नाले यांच्यावरील अतिक्रमण काढून पावसाळ्यापुर्वी उपाययोजना कराव्यात अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा बजरंग दलाचे जिल्हा संयोजक कुणाला भंडारी यांनी दिला आहे.

याबाबत मनपा आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, थोड्याच दिवसात पावसाळा सुरु होत असून महानगरपालिका हद्दीतील नालेसफाई, रस्त्यावरील खड्डे बुजवणे, पथदिव्यांची दुरुस्ती करणे, पावसाळी गटार स्वच्छ करणे या सर्व उपाययोजना शहरामध्ये अद्यापही झालेल्या नाहीत. पावसाळा सुरु होत असून शहरामध्ये जे उपनगरातील नैसर्गिक ओढ्या नाल्यांवर अतिक्रमण करुन ते बुजवुन त्यावर बांधकाम व्यवसायिकांनी पालिकेच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करुन बांधकाम करुन अतिक्रमण केल्याने उपनगरातील रहिवाश्यांच्या घरामध्ये पाणी घुसण्याचे प्रकार काही वर्षांपासुन वाढत आहे.



कुणाल भंडारी

यंदाच्या पावसाची परिस्थिती पाहता नागरिकांच्या घरामध्ये पाणी घुसुन मोठे नुकसान होण्याची दाट शक्यता आहे व नागरिकांच्या आरोग्याचे गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. बऱ्याच ठिकाणचे पथदिवे हे बंद असून यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत असून अनेक ठिकाणी आत्ताच तयार केलेल्या नवीन रस्त्यांवर खड्डे झालेले आहेत. त्यामध्ये पाणी साचुन अपघात होण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने वाहने खड्ड्यात जाऊन पाणी उडल्याने नागरिकांमध्ये अनेक प्रकारचे वादविवाद होतात. त्यामुळे सामाजिक शांततेचा प्रश्न निर्माण होतो. या साचलेल्या पाण्यांमध्ये डासांचे प्रमाण वाढत आहे त्यामुळे डेंगु, मलेरिया चिकन गुणिया सारखे गंभीर आजार पसरण्याची दाट शक्यता आहे. शहरातील प्रभाग अधिकारी, आपत्ती व्यवस्थापन, आरोग्य विभाग अधिकारी, कर्मचारी यांचे नाव व संपर्क क्रमांकाची माहिती प्रसिध्द करावी. पावसाळ्यापुर्वीच्या सर्व उपाययोजना त्वरीत पुर्ण करण्यात याव्यात, अन्यथा तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा कुणाल भंडारी यांनी दिला आहे.

# १५ वा वित्त आयोगातील विविध विकासकामे वेळेत न केल्याने ठेकेदारावर कारवाई करावी

### दरेवाडी ग्रामपंचायतच्या सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांचे पंचायत समिती कार्यालयासमोर उपोषण



पंचायत समिती कार्यालयासमोर उपोषणास बसलेले दरेवाडीचे ग्रामस्थ.

नगर – दरेवाडी ग्रामपंचायतच्या सरपंच सौ. स्वाती सुभाष बेरड यांनी अनेक वेळा जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना पत्र व्यवहार करून देखील गावात १५ वा वित्त आयोग योजनेचे विविध विकास कामे वेळेत न केल्यामुळे परवानाधारक ठेकेदार जाणीवपूर्वक कामे सुरू करत नसल्याच्या निषेधार्थ ठेकेदारावर कारवाई करुन कामे त्वरित चालू करण्याच्या मागणीसाठी पंचायत समितीच्या कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले.

यावेळी सरपंच सौ. स्वाती बेरड, सुभाष बेरड, ग्रामपंचायत सदस्य मच्छिंद्र बेरड, बाबासाहेब वीर, एकनाथ ससे, अक्षय भिंगारदिवे, बाबासाहेब करांडे, संदीप सपकाळ, सौ. आशाताई निंबाळकर, आकाश बडेकर, परमेश्वर बेरड, देविदास करांडे, राजेंद्र रासकर, सुनील बेरड, दीपक घोलप, विजय मोरे, शिवाजी बेरड, बद्रीनाथ बेरड, रमेश बेरड, सागर बेरड, नितीन रासकर, रमेश बेरड, श्रीकांत जगताप, राजू वाकळे, रोहिदास शिंदे, सुनील बेरड, संजय भिंगारदिवे, गोरख बेरड, निखिल बेरड आदी सहभागी होते.

निवेदनात म्हटले आहे की, दरेवाडी गावात १५ वा वित्त आयोग योजने अंतर्गत विविध विकास कामे गावठाण बाजार तळ शौचालय व मुतारी बांधकाम करणे, मुस्लिम समशानभूमीत तार कंपाऊंड करणे, गोकुळवाडी येथील समशानभूमी ओपन स्पेस परिसर तार कंपाऊंड करणे, गावठाण अंगणवाडी दुरुस्ती करणे, इमारत पाऊस पाणी संकलन करणे, अंगणवाडी इमारतीस पत्रा शेड करणे, जि.प. शाळा वाचनालय बांधणे व पाण्याची टाकी जवळ खोली बांधण्याच्या कामासाठी संबंधित ठेकेदार हा दुर्लक्ष करत असून याची जिल्हा परिषद व पंचायत समिती कडे तक्रार केली होती. मात्र तोंडी समज देऊन येत्या आठ दिवसात कामे मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर १० महिने झाले व ग्रामपंचायतीने ठेकेदारांना ३ नोटिसा बजावल्या मात्र त्यांनी घेतलेली कामे केली नाही, त्यामुळे पंचायत समिती कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले असून ठेकेदार अक्षय उंदरे, विक्रांत पानसंबळ, ज्ञानेशवर गोरे या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# शहरात उभ्या असलेल्या जीवघेण्या होर्डिंगवर मनपाने कारवाई करावी

### अन्यथा पीआयएल व एफआयआर दाखल करणार




नगर – शहरातून जाणाऱ्या महामार्गावर मोठ–मोठ्या जाहिरातींचे होर्डिंग्ज उभारण्यात आले आहेत. प्रत्येक रस्त्यावर आणि चौकात या होर्डिंग्ज दिसून येत आहेत. मात्र सक्कर चौकात पेट्रोल पंपाशेजारी १०० फुटापेक्षा उंच होर्डिंग उभारण्यात आलेले असून ते घाटकोपरच्या घटनेची आठवण करून देत आहे.अशाच प्रकारचे एक होर्डिंग चांदणी चौकातही आहे. याची उंची १०० फुटापेक्षाही जास्त असावी. वादळी पावसात या होर्गिंज जीवघेण्या ठरू शकतात. तर याबाबत तातडीने कारवाई करावी अन्यथा पीआयएल व एफआयआर दाखल करण्याचा इशारा दिपक सुतार यांनी दिला आहे.

घाटकोपर येथील घटनेनंतर शहरातील मोठमोठ्या होर्डिंग्जचा विषय ऐरणीवर आला असून, मुंबईसारखीच घटना नगरमध्ये होऊ नये यासाठी योग्य वेळी योग्य काळजी घेणे गरजेचे आहे. या मोठमोठ्या होर्डिंग्जमुळे जीवित हानीसह वित्त हानी व शेजारी असणाऱ्या उड्डाण पुलासही मोठा धोका उद्‌भवू शकतो. होर्डिंगजे मोठमोठे मनोरे शहरात ठिकठिकाणी उभे केले गेले आहेत. अशा मनोऱ्याखालून जातानादेखील भीती वाटते. सदरचे होर्डिंग्ज जाहिरातदार मालकाने विनापरवाना लावल्या आहेत की कोणाच्या वरदहस्ताने लावल्या आहेत याची महापालिकेच्या यंत्रणेमार्फत चौकशी होणे गरजेचे आहे. या गंभीर परिस्थितीची आयुक्तांनी दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी दिपक सुतार यांनी केली आहे.



विस्कळीत पाणीपुरवठा सुरळीत करावा या मागणीचे निवेदन आयुक्त डॉ. पंकज जावळे यांना देताना मालनताई ढोणे, प्रदीप परदेशी, अजय ढोणे व नागरिक. (छाया – लहू दळवी)

# नगर शहरातील पाणी पुरवठा अनेक दिवसांपासून विस्कळीत

### वारंवार महापालिकेकडे तक्रारी करूनही प्रश्न मार्गी नाही; माजी नगरसेवकांचे आयुक्तांना निवेदन

नगर – अनेक दिवसापासून पाणी पुरवठा विस्कळीत झालेला आहे. त्यामुळे नागरिकांना विविध प्रश्नांना सामोरे जावे लागते. वारंवार महापालिकेकडे तक्रारी करून देखील पाणी प्रश्न मार्गी लागला नाही. याचबरोबर पावसाळ्यामध्ये जोरदार पाऊस पडल्यानंतर नागरिकांच्या घरामध्ये पावसाचे पाणी साचले जाते. त्यामुळे नागरिकांचे आर्थिक नुकसान होत असते तरी पावसाळ्यापूर्वी साईट गटारीचे काम मार्गी लावावे. कवडेनगर पंचशील हाउसिंग सोसायटी या भागांमध्ये कॉलनीमध्ये साफसफाईचे काम होत नसून ४ ते ५ दिवस घंटागाडी कचरा घेऊन जाण्यासाठी येत नाही त्यामुळे सर्वत्र कचऱ्याचे ढीग निर्माण होते. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रश्नांकडे आयुक्ताने लक्ष घालून नागरिकांचे प्रश्न तातडीने मार्गी लावावे अशी मागणी माजी उपमहापौर मालनताई ढोणे व माजी नगरसेवक प्रदीप परदेशी यांनी केली.

यावेळी अजय ढोणे सह कमलेश सोसायटीतील नागरिक उपस्थित होते.

# 'शिवसेना वैद्यकीय मदत कक्षा'चा नगरचा अहवाल मुख्यमंत्र्यांना सादर

### मदत कक्षाच्या माध्यमातून रुग्णांना दिलासा देण्याचे काम : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या नगर जिल्ह्यातील कामाचा अहवाल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जिल्हा संपर्कप्रमुख रणजित परदेशी यांनी सादर केला. याप्रसंगी मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे राज्य प्रमुख रामहरी राऊत.

नगर – मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील सर्वसामान्यांना उत्तम आरोग्य सेवा मिळावी, यासाठी स्थापन केलेल्या मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून अनेकांना मोठा लाभ झाला आहे. दुर्धर व मोठ्या आजारांवर मोफत उपचार झाल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून धन्यवाद देण्यात येत आहेत. नगर जिल्ह्यातही या योजनेच्या माध्यमातून अनेक रुग्णांना लाभ झाला. स्थानिक पदाधिकाऱ्यांनी केलेल्या चांगल्या कामांमुळे ही सेवा गरजू रुग्णांपर्यंत पोहचली आहे. आज नगर जिल्ह्याचा अहवाल मुख्यमंत्र्यांना सादर केल्यानंतर त्यांनी पदाधिकाऱ्यांचे कौतुक केल्याने जोमाने काम करण्याचे प्रोत्साहन मिळणार असल्याचे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे जिल्हाप्रमुख रणजित परदेशी यांनी केले.

नगर जिल्ह्यातील शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या नगर जिल्ह्यातील कामाचा अहवाल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जिल्हा संपर्कप्रमुख रणजित परदेशी यांनी सादर केला. याप्रसंगी मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे राज्य प्रमुख रामहरी राऊत उपस्थित होते. यावेळी समन्वयक संदिप सप्रे, उपजिल्हाप्रमुख ओंकार शिंदे, शहरप्रमुख रोहित लोखंडे आदि उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नगर जिल्ह्यात वैद्यकीय मदत कक्षाचे चांगले काम असून, पदाधिकाऱ्यांनी यापुढेही असेच करुन सर्वसामान्य रुग्णांना दिलासा देण्याचे काम करावे, आपणास सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल. यापुढेही गरजू रुग्णांना कसा लाभ होईल, यासाठी प्रयत्न करावेत. नगरचा अहवाल हा राज्यासाठी दिशादर्शक असाच असल्याचे सांगितले.

यावेळी मंगेश चिवटे म्हणाले, नगरमधील रुग्णांना मदत कक्षाच्या माध्यमातून चांगली सेवा उपलब्ध व्हावी, त्यांचा आर्थिक भार कमी व्हावा, यासाठी प्रयत्न केले जात आहे. नगरमधील पदाधिकारी ॲक्टीव्ह असल्याने अनेक रुग्णांना चांगला लाभ झाला आहे. आज सादर झालेला अहवाल सकारात्मक असून, यापुढेही असेच कार्य करत रहावे, असे मार्गदर्शन केले.

यावेळी मंगेश शिंदे, अविनाश व्यवहारे, दिनेश सैंदर, महेश तोडमल, योगेश गोंधळे, तारिक कुरेशी, अभिनंदन कुरमुडे, ओंकार फुलसौंदर विनायक बारटक्के, सुभाष काकडे, किरण जव्हेरी, गिरिष सोनी, विकी गारदे, सागर फुलसौंदर, सुरेश नागापुरे, स्वप्नील भावसार, प्रसाद पादीर, अक्षय वाघमारे, प्रविण पवार, महेश सातपुते आदिंसह नगर जिल्ह्यातील सुमारे ४५० पदाधिकारी उपस्थित होते.

# निवृत्त संचालकांची मनमानी व हुकूमशाही थांबवून सभासदांना ठेवीवरील व्याज द्यावे

### माध्यमिक शिक्षक सोसायटी समोर विरोधी संचालक व सभासदांची निदर्शने



निवृत्त संचालकांची मनमानी व हुकूमशाही थांबवून ठेवीदार सभासदांना ठेवीवरील व्याज मिळण्याच्या मागणीसाठी परिवर्तन मंडळाचे विरोधी संचालक व सभासदांनी शुक्रवारी (दि.१७ मे) माध्यमिक शिक्षक सोसायटी समोर निदर्शने केली. विविध मागण्यासाठी यावेळी घोषणाबाजी करताना अप्पासाहेब शिंदे, बाबासाहेब बोडखे, महेंद्र हिंगे, सभासद वैभव सांगळे, बाळासाहेब निवडुंगे, तौसीफ शेख, राहुल झावरे, बाळासाहेब मुळे, प्रसाद साठे, सतीश इंगळे, प्रसाद सामलेटी, रवींद्र गावडे आदी.

नगर – निवृत्त संचालकांची मनमानी व हुकूमशाही थांबवून ठेवीदार सभासदांना ठेवीवरील व्याज मिळण्याच्या मागणीसाठी परिवर्तन मंडळाचे विरोधी संचालक व सभासदांनी शुक्रवारी (दि.१७ मे) माध्यमिक शिक्षक सोसायटी समोर निदर्शने केली. विविध मागण्यासाठी यावेळी घोषणाबाजी करण्यात आली.

या आंदोलनात विरोधी संचालक अप्पासाहेब शिंदे, बाबासाहेब बोडखे, महेंद्र हिंगे, सभासद वैभव सांगळे, बाळासाहेब निवडुंगे, तौसीफ शेख, राहुल झावरे, बाळासाहेब मुळे, प्रसाद साठे, सतीश इंगळे, प्रसाद सामलेटी, रवींद्र गावडे आदी सहभागी झाले होते.

माध्यमिक शिक्षक सोसायटीचे आर्थिक वर्ष पूर्ण होऊन दोन महिने उलटले असताना देखील ठेवीदार सभासदांना कायम ठेवीवरील व्याज अद्यापी मिळालेले नाही. आर्थिक वर्ष पूर्ण होऊनही संस्थेचे ऑडिट झालेले नाही. दरवर्षी ऑडिटरला ८५ लाख रुपये देऊनही ऑडिट पूर्ण होत नाही, यामागचे गौडबंगाल काय आहे? इतर संस्थांनी मार्च महिना संपल्यावर कायम ठेववरील व्याज सभासदांना दिले आहे. सध्या जनरल मीटिंगची तारीख न ठरल्यामुळे जिल्हाभरातील सभासदांचा असंतोष पसरला आहे. सर्वसाधारण सभा घेण्यासाठी विलंब कशासाठी? हा प्रश्न सत्ताधारी संचालक मंडळाला विचारण्यात आला आहे. तर सोसायटीत चेअरमन, व्हाईस चेअरमन तसेच इतर संचालक काम करीत नसून, आर्थिक हितासाठी एक निवृत्त व्यक्ती संस्था चालवत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

चालू आर्थिक वर्षामध्ये लाभांश १६ टक्के मिळावा, जामीन कर्ज मर्यादा २५ लाख करावी, कायम ठेवीवरील घसरत चाललेला व्याजदर वाढवावा व कर्जावरील व्याजदर कमी करण्याची मागणी करण्यात आली आहे

# नगर शहरातील विस्कळीत पाणीपुरवठा सुरळीत करावा

### ड्रेनेजलाईन सार्वजनिक स्वच्छतेकडे लक्ष घालावे; माजी नगरसेवकांची महापालिका आयुक्तांकडे मागणी



विस्कळीत पाणीपुरवठा सुरळीत करा, ड्रेनेज लाईन सार्वजनिक स्वच्छतेकडे लक्ष घालावे या मागणीचे निवेदन आयुक्त डॉ. पंकज जावळे यांना देताना दत्ता जाधव, दीपक खैरे, प्रशांत गायकवाड. (छाया – लहू दळवी)

नगर – शहरातील काही भागामध्ये पाणीपुरवठा विस्कळीत झाला असल्यामुळे नागरिकांची गैरसोय निर्माण झाली आहे. याचबरोबर अर्बन बँक कॉलनी, झेडपी या भागातील ड्रेनेजचा प्रश्न गंभीर बनला असून सर्वत्र पाणी वाहत असल्यामुळे दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. महापालिकेच्या माध्यमातून नागरिकांचे मूलभूत प्रश्न तातडणे सोडविले गेले पाहिजे यासाठी डॉ. पंकज जावळे यांनी तातडीने लक्ष घालून प्रभाग क्रमांक १५ काटवन खंडोबा, गाझीनगर, आनंदनगर, काळे कॉलनी, पंचशील वाडी मधील नागरिकांचे विविध प्रलंबित प्रश्न सोडावे, अशी मागणी दत्ता जाधव, दीपक खैरे, प्रशांत गायकवाड यांनी केले आहे.

